# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा

'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY 16/1/06


३ ● संक्रमण

५ ● महायान, हीनयान...आणि आता युरोयान

११ ● कल्पनाशक्ती व श्रद्धा हा विज्ञानाचा पाया !

अर्थ-उद्योगातील महिला

१७ ■ ब्रिटिश महिलांच्या कर्तृत्वाला कुंपण मतलबी धोरणांचे

२२ ■ 'ग्लास सीलिंग' टिकणार की फुटणार ?

२६ ■ कथा (आणि व्यथाही) जपानी स्त्रीच्या नोकरीची

२९ ■ संकल्प समतेचा, आरसा अर्थसंकल्पाचा

३३ ● सामाजिक सुरक्षा आणि चीनपुढील पेच

३६ ● जिकडे-तिकडे (•डायपर्स नकोत ! •कुरियर बाळे !)

४१ ● 'काल'चे 'आज'साठी

(.....हेचि जनसेवेचे साधन)



खंड ४ : अंक १० जानेवारी २००६

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## वार्षिक वर्गणी १००/- रुपये

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---


**वर्गणीसाठी पत्ता :**

व्यवस्थापक,

**अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२

: २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल : ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**

**खंड ४ (अंक १०) जानेवारी २००६**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?

**जी सहज चाळता येईल अशी !**

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेखन देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्दिष्ट. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके, पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆ अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

> जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती-तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# संक्रमण

महिना बदलला की भिंतीवरील कॅलेंडरचे पान आपण उलटतो, आणि वर्ष उलटले की कॅलेंडरच बदलून टाकतो. नवीन वर्षाची कोरी करकरीत डायरी आणि कॅलेंडर आपल्या सगळ्यांच्याच घरांत एव्हाना विराजमान झाले असेल. हे सगळेच आता पुरते अंगवळणी पडलेले असल्याने दरवर्षीचे हे आन्हिक आपण विनासायास मनोभावे पार पाडत असतो. हा बदल एका फटक्यात होतो, घडवून आणता येतो. परंतु, व्यक्ती अथवा समाजाच्या विचारविश्वात घडून येणारे संक्रमण ही मात्र, या सगळ्याच्या तुलनेत, अत्यंत संथपणे साकारणारी प्रक्रिया असते. खरे म्हणजे हा एक मोठाच विरोधाभास म्हणावयास हवा. संक्रमणाच्या प्रक्रियेतच गतिमानता अनुस्यूत आहे. मग असे का होते? कोणतेही स्थित्यंतर चटदिशी न स्वीकारणे, हा मानवी मन-प्रवृत्तीचा जणू स्थायीभावच आहे. यामागील कारण उलगडणेही तसे फारसे अवघड नाही. स्थित्यंतराच्या पोटात 'स्वीकार' आणि 'त्याग' या दोन जुळ्या बाबी दडलेल्या असतात. काही गोष्टी नव्याने स्वीकारत असताना जुन्याचा त्याग हा करावाच लागतो. आपली तयारी नसते ती नेमकी या त्यागालाच! जुन्या समजुती, जुनाट ग्रह-दुराग्रह, कालबाह्य धारणा आपण निष्ठापूर्वक उराशी जपलेल्या असतात. ही जळमटे झटकून न टाकताच आम्ही संक्रमणासाठी प्रस्थान ठेवतो. साहजिकच, जुनी गाठोडी खांद्यावर घेऊन प्रवास करावयाचा तर वाटचालीची गती मंदच राहावी यात नवलाव तो कोणता? परंतु म्हणून संक्रमणाच्या प्रक्रियेला सोडचिठ्ठी मात्र द्यायची नसते. उलट त्याचे अनुसंधान अखंड राहण्यासाठीच जागरूक राहावयाचे. जागेपणाने जगाकडे पाहिले तर जाणवेल की हे संक्रमण, अगदी धीम्या गतीने का होईना परंतु, आपल्या सगळ्यांच्याच जगण्यात आता संचारले आहे. अत्यंत सूक्ष्म अशा मानवी मूल्यांचे मंथन करणाऱ्या धर्मचिंतनापासून ते थेट नफ्यासारख्या भौतिक 'टार्गेट'चा पाठपुरावा करणाऱ्या रोकड्या 'कॉर्पोरेट' विश्वापर्यंत कोणतेही क्षेत्र त्यापासून आज अस्पर्शित राहिलेले नाही. पुढील पानांत मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे तो याच सर्वसंचारी संक्रमणाच्या काही बाळपावलांचा.

# वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके'तून विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती अशीच मिळावी. प्रत्येक महिन्याच्या अंकाची उत्सुकतेने वाट पाहतो. वाट पाहणे सार्थकी लागते.

**वसंत गंगाधर धारप, विलेपार्ले (पूर्व) मुंबई**

युरोपीय देशांमध्ये चर्चिल्या जात असलेल्या बहुविधसंस्कृतीवाद या विषयावरील नोव्हेंबर २००५ च्या अंकातील लेख अभ्यसनीय आहे. त्यातील काही मुद्यांबाबत सुचलेले हे विचारः (१) ब्रिटनने अमेरिकेकडून वर्णवंशभेदाची संकल्पना आयात केली असेलही, मात्र या दोन देशांमध्ये मूलतः मोठा फरक आहे. अमेरिका हा जगाच्या विविध भागांतील लोकांनी तेथे जाऊन वास्तव्य करण्यातून आकारास आलेला देश आहे. त्यामुळे अमेरिकेला स्वतःची अशी संस्कृती नाहीच. बहुविधसंस्कृती हाच तेथील पाया आहे असे म्हणावे लागेल. या उलट, ब्रिटिश संस्कृतीचा उदय हा रोमन संस्कृतीतून झालेला आहे. त्यामुळे तेथील चाली-रीती, आचार विचार यावर विशिष्ट विचारांचा पगडा आहे. इंग्लंडने, आशिया-आफ्रिका, ऑस्ट्रेलिया या भूभागांत आपल्या वसाहती स्थापन केल्या. त्यामुळे या वसाहतींमधून इंग्लंडमध्ये ये-जा चालू झाली. ॲफ्रो-एशियन लोकांची इंग्लंडमधील वस्ती वाढत गेली व त्यांचा समाज निर्माण झाला. समाजामध्ये आपल्या जगण्याविषयीच्या हक्कांची जाणीव साहजिकच निर्माण होते. त्यास विरोध झाल्यावर ठिणगी पडणारच. हेच नेमके इथे होऊन वंश-वर्णवाद निर्माण झाला. (२) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे आज 'विश्वग्राम' ही संकल्पना साकार होत असताना जगातील विविध देशांमधील अठरापगड जाती-धर्माच्या, वंशा-वर्णाच्या लोकांची ये-जा विश्वाच्या कानाकोपऱ्यात होणे ही अपरिहार्य गोष्ट आहे. अशा परिस्थितीत, बहुविधसंस्कृती हीच एक विश्वसंस्कृती म्हणून स्वीकारण्याची वेळ येऊ घातली आहे. (३) सरतेशेवटी एक मात्र खेदाने नमूद करावेसे वाटते. भारतात हजारो वर्षांपासून बहुविधसंस्कृती ही 'विविधतेतील एकात्मता' या तत्वानुसार नांदत असताना येथील राजकीय शक्ती मात्र आपल्या तात्कालिक, संकुचित स्वार्थासाठी जाति-धर्मांमध्ये तेढ निर्माण करीत आहेत व त्याला सुशिक्षित तसेच अशिक्षित अशा दोन्ही गटांतील भारतीय जनता बळी पडत आहे.

**सुधीर देशपांडे, विलेपार्ले (पूर्व) मुंबई**

# महायान, हीनयान.... आणि आता 'युरोयान'

'कृ -करणे' या धातूपासून बनलेल्या 'कृती' या शब्दाला 'प्र', 'वि' आणि 'सम्' असे उपसर्ग लागून अनुक्रमे 'प्रकृती', 'विकृती' आणि 'संस्कृती' असे शब्द बनतात. प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे त्यात होणारा बिघाड आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत बिघाड होऊ नये म्हणून तिच्यावर करावयाचे विविध संस्कार होत. ही संस्कृती परंपरेने मानवाला प्राप्त होत असते. संस्कृतीची निर्मिती, तिचा संचय व एका पिढीतून दुसऱ्या पिढीत, दुसरीतून तिसरीत अशी तिची संक्रांती होत जाणे म्हणजेच संस्कृतीची परंपरा होय. व्यक्तींचे, समाजाचे जीवन जसे संस्कृतीने व्यापलेले असते, त्याप्रमाणे संस्कृतींवरही व्यक्तींचा, समाजाचा परिणाम होत असतो, त्यांच्यामुळे संस्कृतींचा प्रवाह बदलता व वाहता असतो. जागतिकीकरणामुळे हा प्रवाह आता खळाळून वाहू लागला आहे. परिणामी, देशोदेशीचे समाजजीवनही त्या खळाळत्या प्रवाहात हेलकावू लागले आहे. धर्म हा संस्कृतीचाच एक भाग असल्याने त्यातही असेच काहीसे घडत आहे. पाश्चात्य संस्कृती जशी पूर्वेकडील देशांमध्ये प्रवेशली आहे, त्याप्रमाणेच पूर्वेकडील संस्कृतीचा भाग असलेला व गौतम बुद्धांनी स्थापन केलेला बौद्ध धर्म पश्चिमेकडील देशांना आता हळूहळू कवेत घेऊ पाहात आहे. 'महायान', 'हीनयान' व 'वज्रयान' या बौद्धधर्मांतर्गत तीन पारंपरिक संप्रदायांनंतर आता 'युरोयान' ('यान' म्हणजे मार्ग) आकार घेऊ लागले आहे. 'युरोयान'कडे वळण्याआधी वर उल्लेखित यानांबाबत थोडी माहिती समजून घेणे उचित ठरेल.

बुद्धांच्या निर्वाणानंतर शंभर वर्षांनी वैशाली येथे दुसरी बौद्ध धर्म परिषद झाली. त्या नंतर बौद्ध संघ अनेक शाखांमध्ये विभक्त झाला. खरे तर बुद्धाने उपदेशिलेला धर्म हा आचारधर्म होता, तो जातिनिरपेक्ष होता, सर्वसमावेशक होता. पण बुद्धांच्या निर्वाणानंतर त्या धर्मात संप्रदायभेद निर्माण झाले. बौद्धधर्मप्रसारासाठी फार मोठे कार्य केलेल्या सम्राट अशोकाच्या काळापर्यंत बौद्ध धर्मात १८ संप्रदाय (निकाय) निर्माण झाले. विभक्त झालेल्या शाखांमध्ये थेरवाद (स्थाविरवाद), सर्वास्तिवाद व महासांघिक

या प्रमुख शाखा होत. महासांघिकातून 'महायान' आकारले; तर स्थाविरवाद व सर्वास्तिवाद यांतून 'हीनयान' आकारले. बौद्ध धर्म मानणाऱ्यांमधील काहींचा मंत्रशक्तीवर विश्वास होता. या मंत्रशक्तीमधूनच मंत्रयानाची व त्यातून 'वज्रयाना'ची निर्मिती झाली. बौद्ध धर्माच्या पाठीराख्यांनी आपापल्या विचारांना अनुसरून वेगळी दिशा पकडल्याने बौद्ध धर्मासमोर आव्हाने उभी ठाकली होती तरीही तो धर्म टिकून राहिला. दरम्यान, या वेगवेगळ्या दिशांना अनुसरून बौद्ध धर्मात वेगवेगळे साहित्यही निर्माण झाले. त्यानंतर सम्राट अशोकाच्या काळात बौद्ध धर्माचा प्रसार भारताबाहेर झाला व पूर्वेकडील देशांमध्ये तो व्यवस्थित रुजलाही होता. चीनमधील ताओ व कन्फ्युशियस धर्म-परंपरांमध्ये व जपानमधील शिंतो धर्म-परंपरांमध्ये बौद्ध धर्म सामावून गेला होता. तिबेट व नेपाळ येथेही बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता. त्या काळी पूर्वेकडील देशांप्रमाणे पश्चिमेत - युरोपमध्येही सम्राट अशोकाचे धर्मप्रसारक पोचले होते (इसवीसन पूर्व ३ रे शतक). पण तेव्हा बौद्ध धर्म तेथील परंपरांमध्ये रुजला नाही. भारतात, सम्राट अशोकापासून सम्राट हर्षवर्धनापर्यंत अनेक राजांनी या धर्माला आश्रय दिला तरी येथे या धर्माची पीछेहाटच झाली (तेरावे-चौदावे शतक). मात्र भारतातील ईशान्येकडील राज्यांमध्ये तो टिकून होता. मग या धर्माची दुरवस्था संपली ती श्रीलंकेतील बौद्ध भिक्खू अनागरिक धर्मपाल यांच्या अथक प्रयत्नांमुळे (इ.स. १८६४ ते १९३३). पुढे भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर (१९५६) त्याला भारतातही ऊर्जितावस्था प्राप्त झाली. आता पुन्हा एकदा बौद्ध धर्मासमोर आव्हान उभे ठाकले आहे आणि तेही आतापर्यंत अपरिचित असलेल्या अशा युरोपच्या भूमीवर. युरोप केवळ भौगोलिकदृष्ट्याच पूर्वेपासून दूर आहे असे नव्हे, तर तेथील धर्म-संस्कृती-परंपराही वेगळी आहे. अभ्यासकांच्या मते, युरोपच्या भूमीवर तेथील परंपरांना सामावून घेत हा धर्म टिकला तर तो जागतिक धर्म म्हणून मान्यता मिळवू शकेल; अन्यथा 'युरोयान' ही एक तात्कालिक घटना ठरेल.

आधुनिक काळात, अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात पश्चिमेकडे बौद्ध धर्माचा चंचुप्रवेश झाला तो काही विचारवंतांच्यामार्फत. पौर्वात्य तत्त्वज्ञानाकडे आकर्षित झालेल्या पाश्चिमात्य विचारवंतांनी पूर्वेच्या विचारप्रवाहांची ओळख पश्चिमेला करून दिली. यात फ्रेडरिक लेगेल, राल्फ वाल्डो इमरसन, ऑर्थर ओपेनहॉर, रिचर्ड वॅगनार, हर्मन हेस, कार्ल जी. जुंग यांची नावे घेता येतील. त्याच शतकाच्या उत्तरार्धात, अमेरिकेत थिऑसॉफिकल सोसायटीच्या एच. पी. ब्लावाटस्की आणि एच. एल.

ऑल्कॉट यांनी पूर्वेच्या विचारांशी मैत्री केली (१८७५). या नंतर अमेरिकेत, थिऑसॉफिकल सोसायटीशी संबंधित काहींनी बौद्ध विचारांचा अभ्यास केला. पण बौद्ध धर्माची खरी ओळख पाश्चात्यांना झाली ती शिकागो तेथे भरलेल्या सर्वधर्मपरिषदेनंतरच (१८९३). त्या काळातच अनागरिक धर्मपाल आणि देईसे टी. सुझुकी (१८७०-१९६६) यांच्या प्रयत्नांमुळे बौद्ध धर्म हा अनेकांपर्यंत पोचला. धर्मपाल यांनी पाश्चात्य धर्मांच्या तुलनेत टिकून राहू शकेल असे बौद्ध धर्माचे परंपरागत स्वरूप पुढे आणले तर सुझुकी यांनी 'झेन बुद्धिझम' लोकांपुढे आणले. यामुळे 'अमेरिकन झेन' असा एक पर्यायही पुढे आला व त्याला मान्यताही मिळाली. हे सर्व केवळ अमेरिकेत घडले असे नाही, तर युरोपमध्येही हे वारे अशाच प्रकारे पोचले. पाश्चात्यांपैकी जॅक केरॉक आणि गॅरी नायदर यांनी बौद्ध धर्म लोकप्रिय केला. पाश्चिमात्य धर्तीची बौद्धिक सूत्रेदेखील त्या काळी रचली गेली (१९६०चे दशक).

युरोपमध्ये 'मेडिटेशन मास्टर' म्हणून प्रसिद्ध झालेले कार्लफ्राइड ग्रॅफ डर्कहेम (१८९६-१९८८) यांनी युरोपियांच्या आध्यात्मिकतेत बौद्ध धर्माच्या विचारांचा अंतर्भाव केला. व्यवहारात ख्रिस्ती धर्म मानणाऱ्या जपानमधील 'झेन मास्टरां'नी, ख्रिश्चन विचारांमध्ये झेन विचार आणण्याचे प्रयत्न केले. हारदा, यासुतानी, यामाडा, कुबोटा आणि फादर ह्युगो नोमिया-लासाले एस.जे. (१८९८-१९९०) यांनी ख्रिश्चन धर्मात प्रवेश केलेल्या झेनविचारांना अधिकृतपणे मान्यता दिली. यामाडा रोशी यांच्या नेतृत्वाखाली जपानी नसलेल्या वीस-बावीस ख्रिश्चनांना (प्रामुख्याने भारत, फिलिपाइन्स, अमेरिका, कॅनडा, जर्मनी आणि स्वित्झर्लंड येथील) हे संमिश्र विचार समाजापर्यंत पोचविण्याची परवानगी देण्यात आली. पण त्यांना अधिकृतपणे 'झेन मास्टर' म्हणायचे का, हा संभ्रम होताच. ख्रिस्तीधर्मीय, व्यवहारात झेनची तत्वे आणू शकतात किंवा नाही असा प्रश्न उपस्थित करण्यात येत असला, तरी आपण प्रत्यक्ष तसे करीत आहोत ही वस्तुस्थिती आहे, असे फादर विल्गीस जॅगेर यांनी म्हटले आहे.

विसाव्या शतकाअखेरीस व अलीकडच्या काळात, युरोपमध्ये बौद्ध धर्माचे अस्तित्व जाणवून देण्याच्या कामी तिबेटमधील बौद्धधर्म महत्त्वाची भूमिका बजावतो आहे. तिबेटचा राजकीय प्रश्न आणि दलाई लामांचे निर्विवाद धार्मिक नेतृत्व यांमुळे बौद्ध धर्माकडे अनेकांचा ओढा वाढला. आता एका बाजूला युरोपच्या भूमीवर व युरोपीय नागरिकांकडून 'युरोयान' आकाराला येत आहे तर, दुसऱ्या बाजूला परंपरागत बौद्ध धर्मही पाश्चिमात्यांना आकर्षित करीत आहे. युरोपमध्ये बौद्ध धर्म महत्त्वाचा ठरतो

आहे याचे व्यवहारातील एक मोठे उदाहरण म्हणजे, बौद्ध धर्मगुरू लामा येशे यांच्या मृत्यूनंतर, स्पॅनिश असलेल्या ओसेल हिता तोरेस् यांची त्या जागी नियुक्ती करण्यात आली (१९८७) हे होय.

**युरोयानातील विविधता**

इतिहासात बौद्धधर्मीयांनी आपापल्या विचारांना अनुसरून वेगवेगळे गट पाडले तशाच प्रकारे - 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या न्यायाने - 'युरोयान' आकाराला येताना दिसते. त्यामुळे 'विविध आचार-विचारांचे, संस्कृतींचे ठसे उमटलेले. एक नक्षीचित्र' असे त्याचे रूप झालेले आढळते. 'युरोयाना'त प्रामुख्याने असे पाच प्रकार दिसतात : **(१) प्राधान्याने बौद्धधर्मीय** व **(२) प्राधान्याने ख्रिस्तीधर्मीय** - हे दोन्ही गट आपापली धर्मविषयक ओळख/अस्मिता जोपासून बौद्ध व ख्रिस्ती धर्माबाबतच्या चर्चेत रस घेतात **(३) बुद्धिस्ट ख्रिश्चन** - ख्रिस्ती धर्मविषयक श्रद्धा प्राधान्याने जोपासून ज्यांनी बौद्धधर्मीय विचार काही प्रमाणात स्वीकारले आहेत ते **(४) ख्रिश्चन बुद्धिस्ट** - बाप्तिस्मा घेतलेले पण आता बौद्धधर्माचा अंगीकार केलेले **(५) अनेकधर्मीय** - दोन वा तीन धर्मांचा अवलंब व्यवहारात करणारे.

'युरोयाना'चा - बौद्ध धर्माचा - अवलंब गांभिर्याने करणाऱ्यांच्या मते हा धर्म तत्त्वज्ञानविषयक व मानसशास्त्रीय सिद्धांत यांच्या मर्यादा ओलांडून मानवी मनाची अंतिम सत्याबाबतची उत्कंठा शमविण्यास साहाय्यभूत ठरू शकतो. ध्यानधारणेद्वारे मनाची आंतरिक शांतता, जीवनव्यवहाराचा व निसर्गाचा समन्वय साधण्याची क्षमता व करुणाभाव या धर्मामुळे वाढीस लागतो, असेही अनेकांना वाटते. याशिवाय युरोपमध्ये बौद्ध धर्माचा विस्तार होण्यासाठी आणखी काही बाबी कारणीभूत ठरल्या. उदाहरणार्थ, अलीकडच्या काळात, व्यक्तींच्या धर्मभावना या परंपरेशी न जोडल्या जाता तो मानसिकतेचा एक भाग समजला जाऊ लागला आहे. त्यामुळे एकापेक्षा अनेक धर्मांचा अवलंब करण्यास आडकाठी राहिलेली नाही. समाजाच्या या मानसिक स्थितीमुळे बौद्ध धर्माकडे बघण्याचा अनेकांचा दृष्टिकोण बदलला आणि विविध क्षेत्रांमधील अनेक जण याकडे आकर्षित होऊ लागले. बौद्ध धर्माच्या आचरणामुळे अनेकांना आपल्या आंतरिक शांततेचा शोध लागला. या पार्श्वभूमीवर युरोपमधील नागरिक बौद्ध धर्माबाबतची आपली भूमिका स्पष्ट करताना 'माझ्या मते बौद्ध धर्म म्हणजे... ' अशी सुरुवात करतात. याचा अर्थ बौद्ध धर्म हा इतर धर्म-परंपरांच्या जातकुळीतला नव्हे; तर तो जीवन जगण्याचा एक मार्ग आहे, त्यात तत्त्वज्ञान व

जीवनव्यवहार यांची सांगड घातली गेली आहे, असे ते मानतात. अशा व्यक्तिगत बौद्धधर्मीय दृष्टिकोणात अस्तित्ववादापासून मिथ्यावादापर्यंतच्या अनेक बाजूंचा विचार होऊ शकतो. तसेच राजकीय मुद्दे वा पर्यावरणीय मुद्देही त्यात समाविष्ट होत असतात असे त्यांना वाटते. बौद्धधर्माचा जो भाव ज्या व्यक्तीला मानवतो तो भाव ती व्यक्ती दैनंदिन व्यवहारांत आणते, असे स्पष्टीकरण या गटांतील व्यक्ती देतात.

युरोपमधील नागरिकांना बौद्ध धर्म रुचण्यामागे एक कारण असेही आहे की, एकीकडे युरोपमधील बुद्धिवाद्यांचे शंकानिरसन करण्याचा प्रयत्नही बौद्ध धर्माद्वारे होतो आहे; तर, दुसरीकडे भावनाप्रधान व्यक्तींनाही समजून घेण्याचा प्रयत्न होतो आहे. ध्यानधारणेच्या माध्यमातून मनाची पद्धतशीर मशागत होते, तसेच 'मार्शल आर्ट'द्वारे मन व शरीर यांच्यातील संतुलन राखण्याचाही प्रयत्न होतो. आधुनिक काळात, पर्यावरणाच्या ऱ्हासासारखे अनेक प्रश्न बिकट होत चालले आहेत. अशा प्रश्नांचा विचार करता, या धर्माद्वारे निसर्ग व जीवनव्यवहारविषयक सर्वसमावेशक एक दृष्टिकोण तयार होण्यास मदत होते, असे 'युरोयान'च्या समर्थकांचे मत आहे. काही ख्रिस्तीधर्मीयांना ख्रिस्ती धर्म अपुरा वाटतो. ख्रिस्ती धर्म व बौद्ध धर्म मिळून ही अपूर्णता दूर करता येते, अशी या गटाची धारणा आहे. बौद्ध धर्म हा एक आचारधर्म आहे. त्यात विस्तार व वृद्धी होण्याची क्षमता असल्याने 'युरोयान' आकारलेले दिसते, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

**ख्रिश्चन व बौद्धधर्मीय यांच्यात संवादी सूर**

'युरोयाना'मुळे युरोपच्या भूमीवर आशियाई मूल्ये आपली पदचिन्हे उमटवू लागली आहेत, त्यामुळे या बदलांना सामोरे जाण्याचे आव्हान युरोपीय मनाला पेलायचे आहे. या वास्तवाचा विचार करता या शतकाचे स्वरूप बहुधर्मीय असेल की पुन्हा एकदा धर्म-संस्कृती संघर्ष उद्‌भवेल, असा प्रश्नही अनेकांच्या मनांत डोकावला आहे. पण ख्रिश्चन व बौद्धधर्मीय यांच्यात झालेल्या चर्चांचा सूर पाहता बहुधर्मीय स्वरूपाकडे ही वाटचाल होण्याची शक्यता अधिक आहे , असे काही अभ्यासकांना वाटते. या संबंधीच्या उभयपक्षी चर्चा प्रामुख्याने खालील मुद्द्यांभोवती केंद्रित झालेल्या दिसतात - **(१) दोन भिन्न धर्म असलेल्या कुटुंबांमधील दैनंदिन जीवनव्यवहार** - दोन भिन्न धर्मांमधील भिन्न आचारसरणी असणारे पती-पत्नी वा कुटुंबातील आधीची पिढी एका धर्माकडे झुकलेली तर नवीन पिढी दुसऱ्या धर्माकडे वा 'युरोयाना'कडे झुकणारी, अशा कुटुंबांचे सामाजिक जीवन, त्यात येणाऱ्या अडचणी

आदी अनेकानेक बाबींचा ऊहापोह यात होतो **(२) नागरिकांचा सर्वसमावेशक दृष्टिकोण तयार होऊन त्यांचा वैचारिक विकास** - यात दोन्ही धर्माच्या नागरिकांनी चालू केलेल्या विविध सामाजिक उपक्रमांत उभय धर्मांच्या नागरिकांनी सहभागी व्हावे यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतात **(३) धर्म व तत्त्वज्ञानविषयक माहितीचे आदान-प्रदान** - 'द युरोपियन नेटवर्क ऑफ बुद्धिस्ट-ख्रिश्चन स्टडीज' यांच्यातर्फे असे अभ्यासगट -चर्चागट आयोजित करण्यात येतात **(४) धार्मिक अनुभवांबाबतची चर्चा** - या संदर्भातील विविधांगी चर्चांमधून बरीच काही चांगली फलनिष्पत्ती होते, असे संबंधितांना आढळते.

**युरोपीय चर्चचा प्रतिसाद**

बौद्ध धर्माबाबतच्या या घडामोडींबाबत युरोपमधील चर्चचा प्रतिसाद कसा असेल, ही अनेकांसाठी एक औत्सुक्याची गोष्ट होती. १९९९च्या मे महिन्यात या विषयावर रोममध्ये एक चर्चा आयोजित करण्यात आली होती. विविध देशांमधील कॅथॉलिक बिशप यात सहभागी झाले होते. यापूर्वी चर्चने घेतलेल्या भूमिकेवर बौद्धधर्मीयांनी नाराजी व्यक्त केली होती. पण अलीकडे बाप्तिस्मा घेतलेल्या ख्रिश्चनांनी बौद्ध धर्माविषयी घेतलेल्या भूमिकेमुळे चर्चलाही आपल्या भूमिकेचा फेरविचार करावा लागला तसेच काही बाबींसदर्भात चर्चलाही आत्मपरीक्षण करावे लागले. त्यामुळे बौद्ध धर्माबाबत संवाद साधण्याचा दृष्टिकोण चर्चने अवलंबिला असून मानवाचे हृदयपरिवर्तन करण्याचा तो एक मार्ग आहे, असे म्हटले आहे. ज्या ख्रिश्चनधर्मीयांनी बौद्ध धर्माला जवळ केले आहे, अशांबाबत चर्चची भूमिका काय असेल, काय असावी असा प्रश्न या वेळी उपस्थित झाला.

तेव्हा एकंदरीत पाहता, ख्रिस्तीधर्मीयांनी व बौद्धधर्मीयांनी परस्परसंबंधांमध्ये आदरभाव दाखवावा व सहिष्णूता वाढवावी, असे या चर्चेत सुचविण्यात आले. यातून असे ध्वनित होते की, चर्चने आखून दिलेल्या मार्गापेक्षा वेगळा मार्ग चोखाळून जर कोणाला आध्यात्मिक अनुभव घेण्याचा वेगळा प्रयत्न करावासा वाटला तर या शतकात, संक्रमणाच्या काळात चर्च आडेमुठे धोरण ठेवणार नाही (तरीही ख्रिस्ती धर्माची मध्यवर्ती संकल्पना व बौद्ध धर्माला चिकटून राहणाऱ्यांची मते यांमुळे काही प्रश्न उपस्थित होऊ शकतातही). 'युरोयाना'च्या संदर्भात चर्चची भूमिका आणखी स्पष्ट व्हायला हवी, असे अभ्यासकांना वाटते.

*(संदर्भ - मायकेल फस यांचा 'धर्मवर्ल्ड' मधील लेख, इंटरनेट)*

विज्ञान

# कल्पनाशक्ती व श्रद्धा हा विज्ञानाचा पाया !

विज्ञानाच्या क्षेत्रात माणसाने अचंबित करणारी प्रगती केली आहे. वैज्ञानिकांचे निरीक्षण, तर्कबुद्धी आणि प्रयोग हा या प्रगतीचा तसेच या आधुनिक विज्ञानाचा पाया आहे, असेच साधारणपणे मानले जाते. पण, इंग्लंडमधील डर्हम विद्यापीठातील इतिहास आणि तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक डेव्हिड नाइट यांनी वेगळाच विचार मांडला आहे. वैज्ञानिकांची 'कल्पनाशक्ती'(imagination) व 'श्रद्धा' यांवरच आधुनिक विज्ञान उभे राहिले आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. वैज्ञानिकांनी कधी आपली कल्पनाशक्ती ताणून तर कधी अंत:प्रेरणेद्वारे आणि क्वचित धार्मिक विश्वास वा मताच्या आधारे कृती केली. त्यामुळे विज्ञानाच्या क्षेत्रात नवनवे बदल घडून आले, असे स्पष्ट करून हुशारीकडे, बुद्धीच्या तेजाकडे, ज्ञानाकडे जाण्याचा मार्ग 'कल्पनाशक्ती' हाच होय, असे प्रतिपादन डेव्हिड नाइट यांनी केले आहे.

त्यांच्या मते, ज्या प्रश्नांची उत्तरे शोधणे हे महाकठीण कर्म होते व त्यांच्या शोधार्थ वैज्ञानिक झगडत होते, त्या वेळी त्यांनी ठराविक चौकटीच्या बाहेर पडून कल्पनाशक्तीच्या आधारे विचार केला. लॅवॉइझर यांची 'थिअरी ऑफ ऑक्सिजन', जॉन डाल्टन यांची 'थिअरी ऑफ ॲटम्स', चार्ल्स डार्विन यांची 'थिअरी ऑफ ईव्होल्यूशन' आणि अल्बर्ट आईनस्टाइन यांची 'थिअरी ऑफ रिलेटिव्हिटी' या प्रक्रियेतूनच आकाराला आली असावी, असे म्हणता येते. या दृष्टीने बुद्धिवंत आणि एककल्ली व्यक्ती यांच्यात फरक करणे खूप कठीण आहे; कारण, कल्पनाशक्तीच्या बळावर जी एखादी बाब त्यांना जाणवते ती खरीच आहे, या श्रद्धेवर ते दोघेही ठाम असतात, आणि त्या विश्वासानेच ते व्यवहारी जगात फार मोठी उडी घेतात. तरीदेखील एकाला समाज 'द्रष्टा' समजून मान देतो तर दुसऱ्याच्या नशिबी टीका येते, असे नाइट म्हणतात.

कल्पनाशक्ती हा मानवी विचारप्रक्रियेचा एक भाग आहे, व्यक्तीची ती एक क्षमता आहे, असे मानले जाते. म्हणजे, व्यक्तीने इंद्रियांच्या मदतीने जे काही अनुभवले असते, पाहिले असते ते त्याच्या मनात कुठेतरी नोंदले गेले असते आणि त्या प्रतिमा वा संकल्पना कल्पनाशक्तीच्या जोरावर मन:पटलावर आणणे तसेच त्यावर प्रक्रिया

करणे, हे व्यक्तीला शक्य होते, हे कल्पनाशक्तीचे वैशिष्ट्य म्हणता येईल. कल्पनाशक्ती ही स्वप्ने (ड्रीम्स) किंवा काल्पनिक जग (फँटसी) यापेक्षा वेगळी असते. काहींच्या मते कल्पनाशक्तीला तार्किकतेची जोड असू शकते आणि त्यात व्यवहार्यताही असू शकते. पण फँटसीबाबत वा स्वप्नांबाबत मात्र तसे म्हणता येत नाही. फँटसी ही वास्तवापासून दूर असते.

कल्पनाशक्तीचा अभ्यास करण्याची सुरुवात अमेरिकेतील प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ विलियम जेम्स यांनी १८९० मध्ये लिहिलेल्या 'प्रिन्सिपल्स ऑफ सायकॉलॉजी' या द्विखंडात्मक ग्रंथानंतर झाली. अलीकडे, कल्पनाशक्ती हा मानवी आकलनक्षमतेचा गाभा मानला जातो. कल्पनाशक्तीच्या साहाय्याने घडून येणारी कलाकाराची निर्मिती ही जशी कुतूहलाची व कौतुकाची बाब ठरली आहे, त्याप्रमाणेच शास्त्रज्ञ शोध कसे लावतात किंवा वैज्ञानिकांना कल्पनाशक्ती कशी साहाय्यभूत ठरते हे देखील कुतूहलाचे ठरले आहे. सृजनशीलता हा जसा कलेचा मध्य आहे त्याप्रमाणेच तो विज्ञानाचाही मध्य आहे. ज्या काही मानसिक क्रिया-प्रक्रियांतून, विचारांमधून कला आकारते त्याच प्रक्रियेतून विज्ञान आकाराला येते; फक्त विज्ञानाला तंत्रज्ञानाचा, प्रयोगाचा पाया असतो, असावा लागतो. आपल्या शोधप्रक्रियेसाठी कल्पनाशक्तीला तार्किकतेची, शास्त्राची, तंत्रज्ञानाची व प्रयोगाची जोड मिळाली असे अनेक शास्त्रज्ञांना पटले होते.

वैज्ञानिकांचे शोध, सृजनशीलता व कल्पनाशक्ती याबाबत काही अभ्यास करण्यात आले आहेत. यासंदर्भात, आईनस्टाइन यांच्या सृजनशीलतेचा अभ्यास केल्यानंतर एका मानसशास्त्रज्ञाने असे नोंदले की, आईनस्टाइन पदार्थविज्ञानातील प्रश्न मुद्दाम वेगळ्या प्रकारे मांडत होते; ही त्यांची पद्धत त्यांच्या संशोधनासाठी फार साहाय्यकारी ठरली. किंबहुना, त्यांच्या मते ज्ञानापेक्षाही महत्त्व आहे ते कल्पनाशक्तीला. मायकेल फॅरडे यांचा अभ्यास करणाऱ्या संशोधिकेने म्हटले आहे की फॅरडे मानसिक प्रतिमानांचा/नमुन्यांचा वापर करीत होते. आणखी एका अभ्यासातून असे स्पष्ट झाले की वैज्ञानिकांच्या विचारप्रक्रियेतील विविध कल्पना व त्या कल्पनांची विविध प्रकारांची फेरमांडणी ही त्यांच्या शोधप्रक्रियेतील महत्त्वाची बाब ठरली होती.

डेव्हिड नाइट म्हणतात की, विज्ञानाला ज्या बाबींचे प्रत्यक्ष आकलन झालेले नसते त्या बाबींवर, आपल्याला 'तसे वाटते' म्हणून विश्वास ठेवणे, यालाही विज्ञानक्षेत्रात मान्यता आहे. जसे की, शोध लागण्याआधी किंवा प्रमेये सिद्ध होण्याआधी केवळ आपल्याला 'ते प्रमेय तसेच असू शकेल असे वाटते' म्हणून, म्हणजे दुसऱ्या

शब्दांत, त्यांचा त्या 'वाटण्या'वर (अंत:प्रेरणा) विश्वास असतो, किंवा त्यांची तशी श्रद्धा वा धारणा असते, म्हणून विज्ञानक्षेत्रात संशोधकांचे अभ्यास सतत चालू असतात. त्यामुळे सिद्ध न झालेली प्रमेये मान्य करायची की फेटाळायची, असा प्रश्न वैज्ञानिकांसमोर नेहमीच उभा ठाकलेला असतो. अशा प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी नेहमीच चर्चा, मतभेद घडत असतात. अशा वेळी काही ठोस निष्कर्ष, पुरावे पुढे आले की चर्चा थांबते. पण तोपर्यंत चर्चेचे वादळ घोंघावत असते.

निरीक्षण आणि प्रयोग हा विज्ञानाचा पाया असला तरी प्रत्यक्षात विज्ञानात त्यापेक्षा अधिकही काही आहे, असे म्हणून डेव्हिड नाइट यांनी, या विधानाच्या पुष्ट्यर्थ एक उदाहरण दिले आहे. १८७० मध्ये, 'ब्रिटिश असोसिएशन फॉर द ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स'च्या (BASS) एका बैठकीत जॉन टिंडाल यांनी असे मत व्यक्त केले होते की, वस्तुनिष्ठ (म्हणजे संशय घेता येणारच नाही अशा काही) बाबींवर विज्ञान आधारलेले आहे, असे नाही; 'कल्पना' हा फक्त परिकथांशी जोडलेला शब्द नाही; तर, प्रयोग आणि गणित यांच्या साहाय्याने तो विज्ञानाशीही जोडलेला आहे. तसेच, न्यूटन, डाल्टन, मायकेल फॅरडे यांच्या विज्ञानातील कामगिरीमागे 'कल्पना'च आहे. विज्ञानाची प्रगती घडून येण्यासाठी सखोल विचार करण्याची आणि एका निष्कर्षावरून दुसऱ्या निष्कर्षाकडे जाण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. केवळ तंत्र हाताशी असणे व ते तंत्र वापरण्याची क्षमता असणे एवढे पुरेसे ठरत नाही. या नंतर चार वर्षांनी जॉन टिंडाल यांनी या संस्थेच्या अध्यक्षपदावरून बोलताना असे मत व्यक्त केले की, आता संशोधकांना अणुविज्ञान, ऊर्जा व उत्क्रांती यांच्या मदतीने जग समजून येऊ लागले आहे. तेव्हा धर्म व धर्मगुरू यांच्यावरील अवलंबन कमी होऊ शकेल. या मतामुळे वादळ उठले. टिंडाल हे अज्ञेयवादी होते. विज्ञानात वा दैनंदिन जीवनात जी गोष्ट पडताळून पाहता येत नाही, ती नाकारण्याकडे त्यांचा कल होता.

मग साहजिकच असा प्रश्न निर्माण होतो की, विज्ञानात कल्पनाशक्ती, श्रद्धा आणि 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर', अशी रोकडी वृत्ती यांचा संगम कसा होऊ शकतो? डेव्हिड नाइट म्हणतात की, या संदर्भात उल्लेखनीय बाब म्हणजे त्या काळचे अनेक संशोधक हे देवाधर्मावर विश्वास ठेवणारे होते आणि प्रयोगशाळेबाहेरचे काही वेगळे ज्ञान वा विचारशक्ती त्यांच्या ठायी होती. टिंडाल स्वत: गिर्यारोहक होते आणि उंच पर्वतावर जाऊन निसर्गाची आराधना करण्यात त्यांना रस होता. त्यांना ज्या संशोधकाबद्दल आदर होता ते मायकेल फॅरडे हे बायबलमधील वचनांवर विश्वास

ठेवणारे होते. अनेक संशोधक हे परलोकविद्याविषयक संशोधनाचे समर्थक होते. मग एक वैज्ञानिक क्रांती घडून आली. अणुविज्ञानाने विज्ञानाचे क्षेत्र ढवळून निघाले. इलेक्ट्रॉन, प्रोटॉन, ऊर्जा, जनुकीय संशोधन अशा अनेक विषयांनी विज्ञानात मोलाची भर घातली. उत्क्रांतीविषयक असलेल्या काही संकल्पनांबाबत प्रश्नचिन्ह उमटले आणि अचानक ब्रिटनचे पंतप्रधान आणि 'ब्रिटिश असोसिएशन फॉर द ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स'या संस्थेचे अध्यक्ष ऑर्थर बॅल्फोर यांनी १९०४मध्ये मांडलेल्या 'श्रद्धा हा विज्ञानाचा पाया आहे,' या मताची शक्यता विचारात घेतली जाऊ लागली. नाइट यांच्या मते या शक्यतेबाबत ह्युम यांनी मांडलेले विचार मननीय आहेत. श्रद्धा ही अतार्किकच असते असे नव्हे; तर ती तर्कसुष्ट असू शकते. या संदर्भात डेव्हिड ह्यूम म्हणतात की, "भविष्यकाळ हा भूतकाळासारखा असू शकेल हे आपल्याला सिद्ध करता येत नाही; तरी तो (भविष्यकाळ) तसा (भूतकाळासारखा) असू शकतो, यावर आपण सहजपणे विश्वास ठेवतो. अशा काही बाबी लक्षात घेतल्या नाही तर विज्ञानाचा अभ्यास करण्याचे प्रयोजनच उरत नाही." मायकेल फॅरडे यांनी असे म्हटले होते की, "भौतिक तत्वांबाबत विचार करण्याआधी नैसर्गिकरित्या काय शक्य आहे वा अशक्य आहे, याची स्पष्टता करून घेणे गरजेचे आहे."

विज्ञानाच्या परिघात, श्रद्धेला महत्त्व असले तरी त्यात निरीक्षणे व प्रयोग यांबरोबर इतरही सर्व शक्याशक्यतांचा विचार करणे व विविध कल्पनांच्या आधारे नवनवीन बाबी हुडकून काढणे यांचाही समावेश असतोच. परिणामी, ज्या वेळी जे योग्य वाटते त्याच्या आधारे वा अंत:प्रेरणेच्या आधारे संशोधक विचार करीत पुढची पावले टाकीत जातात. उदाहरणार्थ, पृथ्वी गोलाकार असून ती सूर्याभोवती फिरते, हे सत्य पुढे आले तेव्हा, श्रद्धेची बाजू अतिशय प्रखर होती आणि पुराव्यांअभावी विज्ञानाची बाजू थोडी दुबळी होती. त्यामुळे विज्ञानाबाबत बरीच चर्चा झाली. अनेकदा असेही घडले की, विज्ञानाशी संबंधित काही नवीन विचार/शक्यता मांडण्यात आल्या तेव्हा अंतिम निष्कर्षाप्रत येण्यासाठी पुरावे होतेच असे नाही. अठराव्या शतकातील बिशप बटलर यांच्या मते, अशा काही पुरावे नसलेल्या शक्यता याच जीवनासाठी मार्गदर्शक ठरत होत्या. ज्यांचा या शक्यतांवर विश्वास नव्हता ते मागे राहिले आणि शक्यतांचा विचार करून विज्ञानाची कास धरणारे जीवनप्रवाहात वेगाने पुढे गेले. यातून शिकायचे ते असे की, तार्किक श्रद्धेच्या जोरावर मारलेली उडी यशाकडे घेऊन जाणारी ठरू शकते. वैज्ञानिकांसाठी तार्किक श्रद्धा कुठली असू शकते ? कार्डिनल

## कल्पनाशक्ती, अंत:प्रेरणा व 'होल ब्रेन थिंकिंग'

कल्पनाशक्ती हा मानवी विचारप्रक्रियेचा एक भाग आहे, व्यक्तीची ती एक क्षमता आहे, असे मानले जाते. त्यामुळे ही क्षमता वाढविता येऊ शकेल काय ? काही अभ्यासकांनी याला होकारार्थी उत्तर दिले आहे. अलीकडच्या मेंदूसंशोधनांतून असे स्पष्ट झाले आहे की, माणसाची विचारप्रक्रिया घडवून आणण्याचे कार्य मेंदूत-नीओकॉर्टेक्समध्ये होते. या नीओकॉर्टेक्सचे डावा व उजवा मेंदू असे दोन भाग पडतात. या दोन्ही अर्धगोलांचे कार्य वेगवेगळे आहे. उदाहरणार्थ, सृजनशीलता, कल्पनाशक्ती हे उजव्या मेंदूचे कार्य आहे तर तार्किकता, सुयोग्य मांडणी हे डाव्या मेंदूचे काम आहे. या दोन्ही अर्धगोलांनी एकत्रितपणे कार्य करणे म्हणजे संपूर्ण मेंदूची विचारप्रक्रिया (होल ब्रेन थिंकिंग) घडून येणे हेच बहुतांशवेळा महत्त्वाचे ठरते. कल्पनाशक्तीला तार्किकतेची जोड मिळणे म्हणजेच 'होल ब्रेन थिंकिंग' होय. विज्ञानविषयक संशोधन पुढे जाण्यासाठी ही प्रक्रिया फार महत्त्वाची ठरत असावी असे दिसून येते. उदाहरणार्थ, 'माणसाला पक्ष्याप्रमाणे उडता आले तर...,' असे वाटणे हा कल्पनाशक्तीचा भाग झाला; पण या कल्पनेला व्यवहारात आणण्यासाठी जे गणित-विज्ञान-तंत्रज्ञान वापरावे लागले तो तार्किकतेचा भाग झाला असे म्हणता येईल. झाडावरून पडणारे फळ खालीच का पडते, हा प्रश्न न्यूटनला पडला, तेव्हा त्याची कल्पनाशक्ती व तार्किकता या दोन्ही एकत्र येऊन काही विचारप्रक्रिया घडली आणि पृथ्वीच्या गुरुत्त्वाकर्षणाचा शोध लागला. आईनस्टाइन यांनीदेखील असे म्हटले होते की, सर्वांच्याच दृष्टीस पडणारी बाब सर्जनशील व्यक्ती पाहात असतात पण त्याबाबत कुणालाच न सुचलेला विचार त्या व्यक्तीला सुचलेला असतो. एखाद्या गोष्टीबाबत आपल्या मनाला तसे वाटणे किंवा मनात गृहीतक आकाराला येणे यामागे अनेकदा अंत:प्रेरणा (इंट्यूशन) असते असे आढळते. त्यामुळे कल्पनाशक्तीमागे अंत:प्रेरणा असते असेही मानले जाते. मेंदूच्या संपूर्ण विचारप्रक्रियेत या अंत:प्रेरणेलाही मान्यता आहे. अंत:प्रेरणेमुळे घेतलेले अनेक निर्णय योग्य ठरतात असे अभ्यासांतून आढळते. अंत:प्रेरणा म्हणजे एखाद्याला मनापासून 'तसे वाटणे'च असते. या वाटण्याला तार्किकतेचा आधार असूही शकतो वा नसूही शकतो. *(संदर्भ - अर्थबोधपत्रिका, मेंदू संशोधन विशेषांक -फेब्रुवारी-मार्च २००५ व अर्थबोधपत्रिका मे २००५)*

न्यूमन यांनी या संदर्भात काही विवेचन केले आहे. त्यांच्या मते श्रद्धा दोन प्रकारच्या आहेत. एक, अमूर्त अशा काही कल्पना माणसाने उराशी बाळगल्या असतात त्या आणि दोन, आपल्या दैनंदिन व्यवहारांवर प्रभाव पाडणाऱ्या अशा काही श्रद्धा माणूस जपून ठेवतो त्या. धर्माच्या संदर्भातील श्रद्धा या पहिल्या गटात मोडतात. या गटातील माणसे काहीतरी अमूर्त अशा श्रद्धांनी परस्परांशी जोडली गेलेली आढळतात. विज्ञानाबाबतही असेच काहीसे घडत असते. कधीकधी, सिद्ध न झालेल्या काही अमूर्त अशा श्रद्धांनी वैज्ञानिक परस्परांशी जोडले गेलेले असतात/जोडले जातात.

डेव्हिड नाइट यांनी वैज्ञानिकांच्या श्रद्धांच्या संदर्भात, त्यांच्या परिचयातील दोन संशोधकांची उदाहरणे दिली आहेत. एका संशोधकाची श्रद्धा अशी होती की जीवरसायनशास्त्र आता महत्त्वाचे ठरणार आहे, म्हणून त्याने त्या संशोधनाला वाहून घेतले; तर दुसऱ्या संशोधकाला असे वाटत होते की पदार्थविज्ञानातील काही बाबींना महत्त्व येणार आहे, म्हणून त्याने त्या संशोधनाचा ध्यास घेतला. कालांतराने विशिष्ट संशोधनाच्या संदर्भात जीवरसायनशास्त्रज्ञ बरोबर ठरला व पदार्थविज्ञानशास्त्रज्ञाचा संशोधनाबाबतचा अंदाज चुकला. मथितार्थ असा की, विज्ञानात काही अंदाज बरोबर ठरतात तर काही चूक. काही प्रयोग यशस्वी होतात तर काही अयशस्वी. पण तार्किक श्रद्धांचा मार्ग अवलंबिला तर पुढे जाणे वा थांबणे हा निर्णय घेता येणे शक्य होते. नाइट यांच्या मते, विज्ञानाच्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी अनेकानेक संशोधकांना श्रद्धेच्या जोरावर, तसेच त्या श्रद्धेला पूरक ठरणाऱ्या तार्किकतेच्या जोरावर अंधारात उड्या घ्याव्या लागल्या आहेत.नाइट म्हणतात, भूतकाळातील अनुभव गाठीशी बांधून तार्किकतेच्या आधारे भविष्याबाबत आपण काही अंदाज बांधू शकतो. कल्पनाशक्ती, प्रयोग, अनुभव आणि तार्किक श्रद्धा यांच्या संगमातून विज्ञान पुढेपुढेच जात राहील अशी अपेक्षा आपण करू शकतो.

कल्पनाशक्ती हा सृजनशीलतेचा एक अविभाज्य घटक आहे हे खरेच. पण कलानिर्मिती वा विज्ञानाच्या क्षेत्रातील सृजनशीलतेशी ज्यांचा थेट संबंध आलेला नाही त्यांच्यासाठीदेखील कल्पनाशक्ती हा महत्त्वाचा घटक ठरू शकतो. कारण, जग अनुभवण्याचा, जगाकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोण त्याद्वारे मिळून आपले दैनंदिन आयुष्य त्यांना वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवता येईल.

*(संदर्भ - न्यू सायंटिस्ट, १३ ऑगस्ट २००५, एन्सायक्लोपिडिया ऑफ क्रिएटिव्हिटी)*

अर्थउद्योगातील
महिला - १

# ब्रिटिश महिलांच्या कर्तृत्वाला कुंपण मतलबी धोरणांचे

घराच्या उंबरठ्याबाहेरील समाजकारणात अलीकडील काळात महिलांचा सातत्याने वाढत असलेला सहभाग हा अनेक क्षेत्रांतील परिवर्तनाचे सूचन करतो. अर्थार्जनाच्या विविध संधींची द्वारे स्त्रियांसाठी खुली होणे, हे तर स्त्रीमुक्तीइतकेच अर्थकारणातील दूरगामी स्थित्यंतराचे सूतोवाच होते. जागतिकीकरणाच्या आजच्या जमान्यात तर अर्थउद्योगांतील महिलांचे विस्तारणारे विश्व हे त्याहीपुढील बदलांचे निर्देशक ठरते आहे. बदलती कुटुंबव्यवस्था, लोकसंख्यावाढ नियंत्रित करण्यासाठी विविध पातळ्यांवर चालू असणारे प्रयत्न, त्यामुळे लोकसंख्येची बदलत असलेली जडणघडण, स्पर्धेचे वाढते प्रमाण आणि त्यातून उद्भवणारी नवनवीन आव्हाने यांसारख्या नानाविध कारणांमुळे उद्योगव्यवसायाच्या क्षेत्रात महिलांच्या सक्रिय सहभागाची वाढती गरज भासते आहे. मात्र यातूनच, अर्थउद्योगासारख्या आजवर मुख्यतः पुरुषप्रधान म्हणूनच समजल्या गेलेल्या क्षेत्रात महिलांच्या रूपाने एक सक्षम हक्कदार पुढे येतो आहे. या बदलत्या वास्तवाचे काही पदर सादर केले आहेत या सलग चार लेखांत.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटनमधील घरटी जवळजवळ एक माणूस युद्धात उतरल्याने घराचे कर्तेपण स्त्रीकडे आले आणि तिला अर्थार्जनासाठी घराबाहेर पडावे लागले. त्याआधीही ब्रिटिश स्त्री नोकरी करीत होती, परंतु फक्त शिक्षण पूर्ण झाल्यावर लग्न होईपर्यंतच! पण दुसऱ्या महायुद्धाने सगळी परिस्थितीच बदलली. नोकरशाहीतील बराच मोठा भाग स्त्रियांनी व्यापला. आज दुसरे महायुद्ध होऊन ६० वर्षे उलटली आहेत. या काळात एव्हाना स्त्रिया व्यवस्थापनातील अत्युच्च पदांपर्यंत पोचायला हव्या होत्या. परंतु वस्तुस्थिती काय सांगते? व्यवस्थापनातील महत्त्वाच्या पदांवर आजही पुरुषांचे प्राबल्य आहे आणि बहुतांश स्त्री वर्ग निम्नस्तरीय पदांपुरताच मर्यादित राहिला आहे.

ब्रिटनमधील स्त्रिया आज मोठ्या प्रमाणावर व्यवस्थापकीय पदांपर्यंत का पोचू शकल्या नाहीत, याचा ऊहापोह करण्यासाठी काही अभ्यासकांनी अनेक तत्कालीन ऐतिहासिक दस्तऐवज आणि त्या कालखंडातील नावाजलेल्या संस्थांच्या कार्यपद्धतींचा

अभ्यास केला. त्यातून जी माहिती समोर आली तिने एका वेगळ्याच सामाजिक विषयावर प्रकाश टाकला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला स्त्रिया मोठ्या प्रमाणावर नोकरी करीत असल्या तरी, त्या काम करीत असलेल्या संस्थांची अधिकारपदे पुरुषांकडे होती. कंपनीची तत्कालीन तसेच भविष्यकालीन धोरणे ठरविण्याचे सर्वाधिकार या पुरुषांकडे होते. त्यांनी आपल्याला सोयीस्कर अशीच धोरणे तयार केली. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर, त्यांनी पुरुषांना सोयीची असलेली परंतु, स्त्रियांची प्रगती खंडित करणारी अशीच धोरणे राबविली. पाऊणशे वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेल्या या धोरणांना आज 'वर्क कल्चर'चे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे या धोरणांचे पालन आपण थोड्याफार फरकाने आजही करीत आहोत.

आपमतलबी धोरणे

तत्कालीन अधिकारी वर्गाने आपल्याला अनुकूल धोरणे बनविली म्हणजे काय केले ? त्यांचा मूळ हेतू काय होता ? आपल्या पश्चात या पदांवर फक्त पुरुषांचीच मक्तेदारी राहावी आणि स्त्रियांनी त्यांच्या जवळपास फिरकूही नये अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी पुरुषांची आणि स्त्रियांची स्नायूबलाच्या जोरावर कामाची जी विभागणी केली जाते त्याचा आधार घेतला. पुरुषांची आणि स्त्रियांची कामे यांची वर्गवारी केली. तरुणांनी करायची कामे आणि अनुभवी लोकांनी करायची कामे यांचीही वर्गवारी केली. वयाची आणि त्यानुसार मिळणाऱ्या पदाची सांगड घातली. म्हणजे उदाहरणार्थ, तुम्ही विसाव्या वर्षी कंपनीत कामाला सुरुवात केलीत तर तुमचे वय जसजसे वाढेल, तसतशी तुम्हाला पदोन्नती मिळत जाईल. तुम्हाला मिळणारी पदोन्नती ही सर्वस्वी तुमच्या वयावर अवलंबून असेल. तिचा तुमच्या गुणवत्तेशी काहीही संबंध नसेल. व्यवस्थापकीय पदापर्यंत पोचायचे असेल तर तुमच्या कामात कुठल्याही प्रकारचा खंड पडता कामा नये. इथे त्यांनी 'कंटिन्युअस इकॉनॉमिक ॲक्टिव्हिटी' आणि 'पेड एम्प्लॉयमेंट' अशा संज्ञा वापरल्या आहेत. या संज्ञा तुमच्या कामाच्या बदल्यात तुम्हाला मिळणाऱ्या आर्थिक मोबदल्याशी निगडित आहेत. कामात खंड पडल्याने जसा त्यातून मिळणाऱ्या अनुभवात खंड पडतो तसाच त्यातून मिळणाऱ्या आर्थिक मोबदल्यातही पडतो. तुम्हाला व्यवस्थापकीय पदांपर्यंत पोचायचे असेल तर तुमच्या अनुभवात आणि आर्थिक मोबदल्यात खंड पडता कामा नये, अशी तरतूद त्यांनी करून ठेवली. इथे अनुभवापेक्षा आर्थिक मोबदला जास्त महत्त्वाचा होता. कारण, अनुभव महत्त्वाचा असता तर स्त्रियांनी कौटुंबिक जबाबदाऱ्यांसाठी

नोकरी सोडल्याने त्यांना नोकरीतला अनुभव जरी नाही तरी, कौटुंबिक आघाडीवर व्यवस्थापनाचा वेगळा अनुभव मिळाला असता आणि त्या जोरावर त्या व्यवस्थापकीय पदांच्या दावेदार झाल्या असत्या.

**धोरणांचा खुबीने वापर**

व्यवस्थापकीय क्षेत्रात तत्कालीन व्यवस्थापकांनी संस्थेचे धोरण किती विचारपूर्वक बनविले आणि त्यातून युक्तीने आणि चातुर्याने आपला हेतू कसा साध्य करून घेतला हे पाहणे उद्बोधक आहे. त्यासाठी ब्रिटनमधील दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील 'ऑफिस मॅनेजर्स असोसिएशन' (ओएमए) या, कार्यालयीन व्यवस्थापन आणि रचना ठरविण्याचे सर्वाधिकार असलेल्या संस्थेच्या नोंदी तसेच 'जे ॲन्ड पी कोट्स्' या कंपनीच्या कार्यपद्धतीचे संदर्भ तपासून पाहू.

'कोट्स् 'ही स्कॉटलंडमधील ग्लासगो येथील कापूस व्यवसायातील एक अग्रगण्य आणि बहुराष्ट्रीय कंपनी होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात या कंपनीचा विस्तारही मोठा होता. या कंपनीची सर्व धोरणे पुरुषांना अनुकूल अशीच होती. पण दुसऱ्या महायुद्धाच्या काळात त्यांना त्यांची ही धोरणे गुंडाळून ठेवावी लागली. युद्धाच्या काळात महिलांनी कंपनीची अधिकारपदे सांभाळली. युद्ध संपले तेव्हा संस्थेच्या कामाचा अनुभव आणि ज्ञान असलेल्या बऱ्याच महिला होत्या. हे ज्ञान आणि अनुभव त्यांना व्यवस्थापकीय कामासाठी निश्चित उपयोगी पडले असते. वास्तविक या काळात महिलांना व्यवस्थापकीय पदांची जबाबदारी पेलावयास मिळण्याची समान संधी होती. परंतु, कंपनीच्या व्यवस्थापक मंडळींनी ठरवून दिलेली वयाची अट त्यांच्या आड आली. युद्धापूर्वीची ब्रिटिश स्त्री लग्न होईपर्यंतच नोकरी करीत असे. पण युद्ध समाप्तीनंतरच्या काळातही तिला नोकरी करणे भाग पडले आणि सर्व सांसारिक जबाबदाऱ्या पार पाडून वयाच्या चाळीसाव्या वर्षी ती पुन्हा कामावर रूजू झाली (स्त्रियांनी सांसारिक जबाबदाऱ्यांसाठी नोकरी सोडणे गृहीतच धरलेले असे). दरम्यानच्या काळात कामात आणि त्यातून मिळणाऱ्या आर्थिक मोबदल्यात खंड पडल्याने त्या आपोआपच व्यवस्थापकीय पदाच्या शर्यतीतून बाहेर पडल्या. दुसरीकडे, पुन्हा पहिल्यापासून श्रीगणेशा करायचा म्हटले तरी वयाचे आणि काम करीत असलेल्या पदाचे गणित ठरलेले असल्याने शिकाऊ उमेदवारांच्या नामावलीतूनही त्या केव्हाच बाद झालेल्या होत्या. त्यामुळे व्यवस्थापकीय पद सांभाळणे हे महिलांचे काम नोहे, त्यांना ते कधीच जमणार नाही, अशी थातूरमातूर विधाने करण्यापेक्षा हा युक्तिवाद महिलांची कोंडी

करणारा होता. दुसऱ्या महायुद्धानंतर वयस्कर स्त्रियांमधील नोकरी करण्याचे प्रमाण वाढले. पण, त्यांचा अनुभव जमेस धरूनही केवळ तात्पुरत्या स्वरूपाच्या आणि फारसे कौशल्याचे काम नसलेल्या नोकऱ्याच त्यांना देऊ केल्या गेल्या.

महिलांनी नोकरशाहीत प्रवेश केल्याने नोकरशाहीचा, त्यातील 'अधिकार उतरंडी'चा (Hierarchy) अधिक विस्तार झाला. नोकरशाहीच्या निवडप्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे ही प्रक्रिया गुणवत्तेवर आधारलेली असते. तुमची क्षमता आणि कुशलता मिळून गुणवत्ता ठरते. अनेक अभ्यासकांच्या मते 'गुणवत्ता' हाच खरा निवडीचा निकष आहे. यात ना लिंगभेदाचा मुद्दा आडवा येत ना उमेदवाराच्या वयाचा! परंतु, अभ्यासकांना असे आढळून आले की, निवडीची प्रक्रिया किंवा कामगारांना मिळणारी बढती ही त्यांच्या गुणवत्तेवर त्यांना मिळत असली तरी, या काळात ज्या गुणवत्तामापन कसोट्या वापरल्या गेल्या त्या पूर्वग्रहदूषित होत्या. उदाहरणार्थ, उमेदवार कुठल्या शाळेत शिकला आहे, तो मूळचा कुठला आहे, यावरही उमेदवाराला झुकते माप मिळत असे. थोडक्यात, आपल्याला हवे आहेत त्याच प्रकारच्या आणि पुढेही आपलाच कित्ता गिरवतील अशाच प्रकारच्या उमेदवारांना प्राधान्य देण्याचे धोरण या अधिकाऱ्यांनी अवलंबिले.

१९५०च्या दरम्यान स्वतःला आधुनिक कंपनी म्हणवून घेणाऱ्या 'कोट्स्' कंपनीने नोकरशाहीलाही आधुनिक तोंडवळा बहाल करण्याच्या उद्देशाने अधिकारी - पदाच्या प्रशिक्षणासाठी वेगळे प्रशिक्षण वर्ग सुरू केले. याला 'मॅनेजमेंट ट्रेनिंग प्रोग्रॅम' असे गोंडस नावही दिले. तरुणांचा व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणावयाचा आणि व्यावसायिकदृष्ट्याही त्यांना परिपक्व बनवावयाचे, हा जरी त्यांचा (वरकरणी) उद्देश असला, तरी त्यांचा अंतस्थ हेतू मात्र, आपल्याला हवे तसे भावी अधिकारी आपल्या मूशीतून घडवायचे, हा होता. या प्रशिक्षणासाठी, ज्यांचे वय २० वर्षे आहे अशा तरुणांचाच फक्त विचार केला गेला, तरुणींचा नाही. परंतु, 'कोट्स्'च्या व्यवस्थापनाला एकदाही असे वाटले नाही की, ज्या महिला आपल्याकडे गेली काही वर्षे काम करीत आहेत, ज्यांनी उत्तम कामगिरी पार पाडली आहे आणि ज्यांच्याकडे पुरेसा अनुभवही आहे, अशा महिलांचा या प्रशिक्षणासाठी विचार करावा.

सामाजिक संस्थांचा पाठिंबा

'ब्रिटिश स्टॅण्डर्ड इन्स्टिटयूशन'ने युद्धकाळात प्रसिद्ध केलेल्या एका पुस्तिकेत म्हटले आहे - " The factors which should be taken into account in

fixing the basic rates of clerical payment would include sex, age, length of service, geographical location, number of hours to the working week, conditions of work the clerk is performing, and the merit with which he or she is performing it." या विधानावरून एक गोष्ट लक्षात येते ती अशी की, कामगाराचा मोबदला ठरवितानाही त्याचे लिंग आणि वय याच बाबी सर्वांत प्रथम तर, त्याची गुणवत्ता सर्वांत शेवटी विचारात घेतली गेली आहे. 'ओएमए'नेही 'अधिकार उतरंड' ठरविताना आणि त्यासाठी आवश्यक असे निकष स्पष्ट करताना कामगाराचे वय, त्याच्या वर्तमान तसेच भविष्यकालीन कामाचे स्वरूप याची एक चौकटच आखून दिली आहे. विशेष म्हणजे ही चौकट मोडण्याची धमक त्या काळी एकाही संस्थेने वा कंपनीने दाखविली नाही.

व्यवस्थापन क्षेत्रात आजच्या घडीला बरेच बदल होत आहेत. नवीन संकल्पनांचे हे क्षेत्र स्वागत करीत आहे. तरीही बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पूर्वीच्याच कल्पना आणि गृहीतकांच्या आधारे समाजाचे आणि अनेक संस्थांचे रहाटगाडगे आजही चालू आहे. कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम करणाऱ्या स्त्रिया आजही खूप तुरळक दिसतात. तरुण वय आणि अधिकारीपरंपरेतील कनिष्ठ पायरी यांचे नाते अद्यापही पूर्वीसारखेच आहे. संस्थेसाठी तुम्ही दिलेला वेळ आणि काळ यावर जोखली जाणारी संस्थेविषयीची बांधिलकी, यासारख्या कल्पना घेऊन आपण आजही जगतो आहोत. या कल्पनांना समूळ उखडून टाकणे अवघड असले तरी अशक्य मात्र नाही. अलीकडच्या काही वर्षांत व्यवस्थापन क्षेत्राची दारे स्त्रियांसाठी थोडी किलकिली झाली आहेत. हा मार्ग पूर्ण मोकळा झाला तरच स्त्री आपल्या बुद्धिमत्तेचा वापर विविधांगांनी करू शकेल. त्यासाठी या जुनाट, बुरसट आणि त्यापेक्षाही अतार्किक आणि अनैसर्गिक समजांना आपल्याला मूठमाती द्यावी लागेल.

या गोष्टीची सुरुवात प्रथम घरापासूनच होणे अगत्याचे आहे. आपल्या बायकोचे कर्तृत्व फुलविण्यासाठी नवऱ्याने तिला सहकार्य करायला हवे. अपत्यसंगोपन तसेच अन्य कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत असताना तिच्या खांद्याला खांदा भिडवून उभे राहावयास हवे. बायकोचे कर्तृत्व कांकणभर सरस असेल तर तिला आणखी पुढे जायला प्रोत्साहन द्यायला हवे. एखादा पुरुष जर असे करत असेल तर त्याला नाउमेद न करता समाजाने त्याचे कौतुक करायला हवे.

*(संदर्भ - जेन्डर इश्युज, विंटर २००५ )*

✿✿

# 'ग्लास सीलिंग' टिकणार की फुटणार ?

जगभरातील 'कॉर्पोरेट' विश्व आज संक्रमणावस्थेत आहे. या संक्रमणाचा संबंध आहे तो कंपन्यांच्या संचालक मंडळांसह एकंदरच वरिष्ठ व्यवस्थापनाचा पारंपरिक असा पुरुषप्रधान, पुरुषीवर्चस्वाचा तोंडवळा बदलण्याशी. जगभरात हातपाय पसरवू इच्छिणाऱ्या अग्रगण्य कंपन्यांच्या वरिष्ठ स्तरांवर, सर्वोच्च पातळीवरील निर्णयप्रक्रियेत महिलांचा शिरकाव आजवर अत्यल्प प्रमाणातच झालेला दिसतो. उद्योगविश्वात उच्च पदांवर काम करण्यास सक्षम, पात्र, उच्चविद्याविभूषित स्त्रियांचे एकूणांतील तुलनेने अल्प असणारे प्रमाण हे त्यामागील एक कारण असले तरी, महिलांच्या 'बोर्ड रूम'मधील प्रवेशास मुख्य अडसर होता व आहे तो पुरुषी मानसिकतेचाच, हे आजवर पुरेशा अभ्यासांती प्रस्थापित झालेले वास्तव आहे. परंतु, आजचे औद्योगिक वास्तवच इतक्या झपाट्याने बदलते आहे की नानाविध संस्कृतींची मिसळ-सरमिसळ घडून येत असलेल्या विद्यमान जगात कंपन्यांचे तारू तरण्यासाठी त्यांच्या संचालन-व्यवस्थापनात महिलांचा सक्रिय सहभाग असणे ही व्यावसायिक अनिवार्यता बनत आहे. परिणामी, शेजारील खुर्चीवर समानाधिकारी एक महिला स्थानापन्न झाल्याचा कितीही मानसिक त्रास झाला तरी, संचालक मंडळातील पुरुष संचालकांना तो इथून पुढे सहन करावा लागेल, अशी चिन्हे दिसत आहेत. कारण, सध्याच्या विलक्षण स्पर्धात्मक जगात प्रश्न (पुरुषी) अहंकार जपण्याचा नसून स्पर्धेच्या वावटळीत कंपनीचे जहाज तरते ठेवण्याचा आहे.

उद्योग-व्यवसायांत विविध स्तरांवर कार्यरत असलेल्या महिला जगभरच अगणित असल्या तरी, वरिष्ठ व्यवस्थापनात त्यांना प्रवेश मिळतो तो अभावानेच. वरिष्ठ 'कॉर्पोरेट' निर्णयप्रक्रियेत महिलांच्या सहभागास प्रतिबंध करणाऱ्या या अडथळ्याचे 'ग्लास सीलिंग' अशी विलक्षण समर्पक संज्ञा बहाल करून 'वॉल स्ट्रीट जर्नल'ने २० वर्षांपूर्वीच बारसे केले होते. स्वकर्तृत्वाच्या बळावर 'कॉर्पोरेट' विश्वातील उच्च पदे एकामागोमाग एक संपादन करीत अधिकारश्रेणीत वर चढणाऱ्या कर्तबगार महिलेस या 'ग्लास सीलिंग'पाशी मात्र नाइलाजाने थबकावेच लागते. कंपनीच्या 'बोर्ड रूम'मधील

खुर्ची, स्थान त्या महिलेच्या नजरेच्या टप्प्यात असते, मात्र तिथे स्थानापन्न होणे हे प्रत्यक्षात दुरापास्तच असते. असे हे पारदर्शक परंतु पोलादी, अभेद्य 'ग्लास सीलिंग'! वरिष्ठ स्तरावरील (कॉर्पोरेट) निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविण्याबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी अमेरिकी सरकारने १९९५मध्ये 'ग्लास सीलिंग कमिशन'ही नेमले होते. आयोगाच्या पाहणीनुसार, श्रमांच्या तत्कालीन अमेरिकी बाजारपेठेत महिलांचे प्रमाण होते जवळपास ४६ टक्के. मात्र, 'कॉर्पोरेट' जगतातील वरिष्ठ व्यवस्थापनात सक्रिय असणाऱ्या महिलांचे एकूणांतील प्रमाण होते जेमतेम पाच टक्के. केवळ इतकेच नाही तर, त्याच वरिष्ठ वर्तुळात कार्यरत असणाऱ्या महिला अधिकाऱ्यांचे वेतन हे त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनाच्या ६८ टक्के इतकेच होते.

त्यानंतर १० वर्षांनी, म्हणजे २००५ सालातही परिस्थिती फारशी बदललेली नव्हती. स्त्रियांचे अमेरिकी कामगार दलातील प्रमाण ४६ टक्क्यांच्या आसपासच स्थिर होते. मात्र, 'कॉर्पोरेट' जगतातील उच्चपदस्थ महिला अधिकाऱ्यांचे प्रमाण आठ टक्क्यांना टेकू पाहत होते. महिला तसेच पुरुष उच्चाधिकाऱ्यांच्या वेतनातील विषमताही अंमळ घटली होती. उच्चपदस्थ महिला अधिकाऱ्यांचे वेतन हे त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनाच्या ७२ टक्के इतके झाले होते! युरोपातील चित्रदेखील फारसे निराळे मुळीच नाही. सर्वाधिक 'पे पॅकेज' खिशात घालणाऱ्या २५ युरोपीय मुख्याधिकाऱ्यांच्या, 'फॉर्च्यून' नियतकालिकाने २००५मध्ये केलेल्या पाहणीत एकही महिला नव्हती. अगदी दोन वर्षांपूर्वीपर्यंत, ६५ टक्के ब्रिटिश कंपन्यांच्या संचालक मंडळावर एकदेखील महिला आढळून आली नाही. एकंदर श्रमिकांमध्ये जवळपास ४४ टक्के महिला असणाऱ्या ब्रिटनमध्ये सर्वोच्च पद महिलेने भूषविलेली एकही ब्रिटिश कंपनी नाही. सुमारे तीन दशकांपूर्वीच्या जपानमध्ये तर सायंकाळी पाचनंतर महिला कर्मचाऱ्यांनी कार्यालयात थांबणे, हा जणू गुन्हाच समजला जात असे! गेल्या वर्षी अवघ्या दोन जपानी कंपन्यांच्या प्रमुखपदी महिलांची नावे झळकली.

'कॉर्पोरेट' जगतामध्ये उच्चपदांवरील निर्णयप्रक्रियेत महिलांचे प्रमाण एवढे कमी का, याबाबत प्रचलित असणाऱ्या स्पष्टीकरणांमध्येही कोठे तरी पुरुषी दृष्टिकोण जाणवतो. महिलांना मुळातच महत्त्वाकांक्षा अशी फारशी नसतेच, कंपनीतील सर्वोच्च वरिष्ठ पदापर्यंत पोहोचण्यास महिलाच बहुतेकवेळा अनुत्सुक असतात, 'कॉर्पोरेट' जगतातील वरच्या पदांवर काम करीत असताना व्यावसायिक कौशल्यांइतकेच त्या स्तरावरील राजकारणातही जे तरबेज असणे गरजेचे असते ते स्त्रियांच्या प्रकृती-

प्रवृत्तीला मानवणारे नसल्याने त्या वर्तुळात त्यांचा जम बसू शकत नाही, असे नानाविध विचारप्रवाह, समज-गैरसमज, स्पष्टीकरणे या संदर्भात प्रचलित आहेत.

यामध्ये तथ्यांश अजिबातच नाही, असेही नाही. परंतु, सर्वच महिलांना पुरुषांच्या तुलनेत महत्त्वाकांक्षा कमी वा सौम्य असते, असे सरसकट विधानही वस्तुस्थितीशी पूर्णतः संवादी असल्याचे आढळून येत नाही. वास्तवात, 'ग्लास सीलिंग' तोडण्यात महिलांना सर्वाधिक आड येतो तो पुरुषी अहंकार आणि बढत्यांच्या संदर्भातील कंपन्यांची धोरणे - असेच या क्षेत्रातील आजवरच्या अभ्यासाचे अनुमान आहे. बऱ्याच महिलांना घर तसेच मुलांच्या गरजांनुसार करिअरच्या मध्यावरच रूळ बदलणे अनिवार्य ठरते. मुलांचे संगोपन, घरातील वयोवृद्धांची सेवाशुश्रुषा यापायी करिअरमधून काही काळ तरी 'ब्रेक' घेणे हे अनेक महिलांना भाग पडते. महिलांच्या करिअरसंदर्भातील हा पैलू कंपन्या नजरेआड करतात. करिअरमधील बढत्यांसाठी 'अ-खंडित' सेवा व अशा 'अ-खंडित' सेवेचा एकंदर कालावधी हेच मुख्य निकष मानले जातात. साहजिकच, अनेक कर्तृत्त्ववान परंतु कौटुंबिक कारणांपायी करिअरमध्ये 'ब्रेक' घेतलेल्या महिला 'ग्लास सीलिंग'पर्यंत जाऊन तिथेच अडकतात.

खंडित सेवेनंतर पुन्हा करिअर पूर्ववत सुरू करण्यास इच्छुक महिलाही बहुसंख्य आहेत. मात्र, त्यांना पुनर्प्रवेशाची संधी मिळतेच असेही नाही. मिळालीच तरी काही तडजोडी अपरिहार्यपणे स्वीकाराव्या लागतात. अमेरिकेतील पदवीधर व्यवस्थापकांच्या करण्यात आलेल्या एका पाहणीनुसार, खंडित सेवेनंतर पुन्हा कामावर परतणाऱ्या महिलांच्या अर्थार्जन क्षमतेची सुमारे ३७ टक्के इतकी हानी झाल्याचे आढळून आले. त्यातच, वाढत्या स्पर्धेपायी एकंदरच व्यवस्थापनाचे आकारमान सडपातळ राखण्याकडे कंपन्यांचा कल वाढता आहे. त्यामुळे बढत्यांसंदर्भातील स्पर्धाही तीव्र बनली आहे. वरिष्ठ पदे भूषविण्याची मानसिकता आणि क्षमता असणाऱ्या महिलांना घरातूनही आवश्यक ते सहकार्य मिळत नाही. वाढत्या व्यावसायिक जबाबदाऱ्यांना समांतर घरातील व्यापही वाढत असतात. हा भार, काही प्रमाणात का होईना परंतु, विभागून घेण्यासाठी तिथे नवरा मात्र पुढे येत नाही. अखेर, व्यावसायिक आव्हाने आणि कौटुंबिक आघाडीवरील वाढता पसारा यांचा मेळ घालताना स्त्रिया मेटाकुटीला येतात.

अशा नानाविध कारणांपायी 'कॉर्पोरेट' विश्वातील सर्वोच्च वर्तुळात आजवर अत्यल्प असणारे स्त्रियांचे प्रमाण वाढविण्याची व्यावसायिक निकड आता 'कॉर्पोरेट' विश्वालाच जाणवू लागली आहे. आजच्या २१व्या शतकातील 'कॉर्पोरेट' आव्हानांना

सामोरे जाताना विविधांगी, चौफेर कौशल्ये, अनेक प्रकारची कामे करण्याच्या क्षमता, समूहाने कार्य करण्याची खुबी, विविध स्तरांवर संवाद प्रस्थापित करून प्रकल्प सिद्धीस नेण्याची हातोटी या गुणांची आवश्यकता आहे. स्त्रीच्या मेंदूची नैसर्गिक जडणघडणच यांत महत्त्वाची भूमिका बजावते. तर्कशुद्ध विचार करणारा मानवी मेंदूचा तार्किक भाग आणि मानवी मेंदूचेच भावनाप्रधान, करुणामय अंग यांचा सहबंध स्त्रियांमध्ये अधिक घनिष्ठ असतो. म्हणूनच, भावनाप्रधानता आणि बुद्धी यांचे सुयोग्य व संतुलित साहचर्य घडवून आणून सर्वांगीण विचार करण्याची स्त्रीच्या मेंदूची अंगभूत शक्ती हेच तिचे आगामी काळातील व्यावसायिक सामर्थ्य ठरावे.

अमेरिका, ब्रिटन तसेच स्कॅन्डिनेव्हियन देशांमध्ये सध्या चालू असलेले संशोधन या संदर्भात मननीय आहे. कंपनीची अथवा उद्योगाची लाभप्रदता, भागधारकांना मिळणारा परतावा आणि कंपनीच्या उच्चपदस्थ कार्यकारी मंडळात समाविष्ट असणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण यांत आजवरच्या संशोधनांती आढळून आलेला भरभक्कम सहसंबंध जगभरातील अग्रगण्य कंपन्यांना अंतर्मुख बनण्यास भाग पाडत आहे. यातूनच, 'कॉर्पोरेट' विश्वाची सामाजिक बांधिलकी जपण्याच्या ऊर्मीपेक्षाही उद्योगाचे व्यावसायिक हित जपण्यासाठी ए.बी.बी., बी.पी., जनरल इलेक्ट्रिक यांसारख्या कंपन्या आता व्यवस्थापनातील उच्च पदांवर महिला अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसाठी प्रयत्नशील आहेत. सर्वोच्च स्तरावरील निर्णयप्रक्रियेत भरणा असलेल्या यच्चयावत पुरुष संचालकांना संगणक उद्योगातील बदलत्या वाऱ्यांचा वेधच घेता न आल्याने १९९०च्या प्रारंभी आय बी एमसारख्या विश्वविख्यात कंपनीस खडतर व्यावसायिक कालखंडाचा सामना करावा लागला, अशी उपपत्ती मांडली जात आहे. अकल्पित दिशांनी उद्भवू शकणाऱ्या व्यावसायिक आव्हानांचा वेध घेण्यास महिला तसेच पुरुषांचा अंतर्भाव असणारी संमिश्र स्वरूपाची संचालक मंडळे अधिक सक्षम ठरतात, ही धारणा महिलांच्या 'कॉर्पोरेट' विश्वाच्या निर्णयप्रक्रियेतील वाढत्या सहभागास पूरक ठरत आहे.

त्यातूनच या क्षेत्राचा महिलांकडे बघण्याचा जुनाट दृष्टिकोण आता हळूहळू बदलत आहे. कामकाजाच्या लवचीक वेळा, पुनर्प्रवेशास प्रोत्साहन व त्यासंदर्भातील उदार धोरण, पुनर्प्रशिक्षणाच्या सुविधांची तजवीज, अर्धवेळ कामाची सवलत यांसारख्या उपक्रमांमुळे आजवर अभेद्य भासणाऱ्या 'ग्लास सीलिंग'ला तडे जाण्याच्या शक्यता दिसू लागल्या आहेत.

*(संदर्भ : इकॉनॉमिस्ट)*

अर्थउद्योगातील महिला - ३

# कथा (आणि व्यथाही) जपानी स्त्रीच्या नोकरीची

स्त्रियांची नोकरी या विषयात तसे नावीन्य राहिलेले नसले तरी देशोदेशींच्या स्त्रियांना आज -२१ व्या शतकातही - नोकऱ्यांमध्ये असमानतेला सामोरे जावे लागते ही खेदाची बाब आहे. या संदर्भात जपानमधील स्त्रियांची स्थिती फारशी वेगळी नाही. जपानमधील स्त्रियांसाठी विविध क्षेत्रांत नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध आहेत असे एकीकडे दिसत असले; तरी दुसरीकडे बहुतांश स्त्रियांना या वाढीव संधींचा प्रत्यक्षातील लाभ मात्र घेता येत नाही, असा विरोधाभास तेथे आढळतो. असे घडणे कसे शक्य आहे ?

या विषयाचा अभ्यास करणारे प्रा. चार्ल्स विदर्स (ओसाका सिटी युनिव्हर्सिटी) यांनी काही निरीक्षणे मांडली आहेत. त्यांच्या मते, जपानमध्ये विसाव्या शतकाअखेरीपर्यंत स्त्रियांसाठी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या उपलब्ध झाल्या होत्या. त्यातच अलीकडच्या काळात, बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेत नोकऱ्यांच्या प्रकारात वाढ झालीच; शिवाय, स्पर्धेला महत्त्व आल्याने नोकरी देताना लिंगभेदापेक्षा गुणवत्ता जोखली जाऊ लागली. काही नोकऱ्यांमध्ये तर स्त्रियांनी चांगले काम करून पुरुषांना मागे टाकल्याचीही उदाहरणे आहेत. त्यामुळेदेखील स्त्रियांना मिळणाऱ्या नोकऱ्यांमध्ये वाढ झाली. पण तरी त्यांना वास्तवात नोकऱ्यांच्या संधी मिळाल्या असे म्हणता येत नाही. कारण, स्त्रियांना नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध झाल्या असल्या तरी प्रत्यक्षात मात्र अनेक संस्था/कंपन्या खर्च कमी व्हावा म्हणून नियमित कर्मचाऱ्यांऐवजी (जपानी भाषेत सेईकी) त्यांना अनियमित कर्मचारी (हिसेईकी) वा अर्धवेळ कर्मचारी (पाटो) म्हणून नेमतात. कधी त्यांना कमी पगार देण्यात येतो, तर कधी त्यांच्याकडून कंत्राटी पद्धतीने काम करवून घेतले जाते. त्यामुळे नियमित वेतन घेणाऱ्या नोकरदारांच्या संख्येचा विचार केला तर अशा प्रकारे अनियमित कर्मचारी असणाऱ्या स्त्रियांचे एकूणातील प्रमाण ३४.५ टक्के आढळले (२००३). अशा महिलांचे प्रमाण अलीकडच्या काळात वाढत असून या प्रकाराला जपानी भाषेत हिसेईकिका (non-regularization) असे म्हणण्यात येत आहे. लक्षात घेण्यासारखी बाब अशी की, अनियमित कर्मचारी असण्याची सोय अनेक गृहिणी व लहान मुलांच्या मातांच्या पथ्यावर पडत आहे. पण ज्यांना अनिच्छेने ही बाब मान्य करावी लागते अशांचे प्रमाणही गेल्या काही वर्षांत वाढत आहे. शिवाय नियमित कर्मचाऱ्यांच्या गटात मोडणाऱ्या काही स्त्रियांनाही

पदोन्नती न मिळणे, लैंगिक छळ सहन करावा लागणे आणि बालसंगोपनाची रजा न मिळणे अशा मानसिक त्रासांना सामोरे जावे लागत आहे. जपानच्या अर्थव्यवस्थेचा, मनुष्यबळाचा विचार करता स्त्रियांनी नोकऱ्या करणे हे गरजेचे आहे, ही वस्तुस्थिती समाजमान्य असतानाही सुधारणा करणाऱ्या धोरणकर्त्यांना स्त्रियांचे नोकरीतील हक्क जपण्याच्या कामी फारशी प्रगती करता आलेली नाही. तथापि नवे धोरण आखताना व ते जपानच्या संसदेपुढे - डाएटसमोर - ठेवण्यापूर्वी श्रमकल्याण खात्याच्या मंत्रालयाने काही तज्ज्ञ मंडळींची एक चर्चा आयोजित केली होती. त्यात कर्मचारी संघटना व व्यापार-उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, कायदेतज्ज्ञ, या विषयाचे अभ्यासक व पत्रकार यांचा समावेश करण्यात आला होता. बालसंगोपनाची रजा नाकारण्यावर बंदी, अप्रत्यक्ष लिंगभेदावर बंदी, स्त्री-कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ होऊ नये यासाठी कडक उपाययोजना, सकारात्मक कृती ('अफर्मेटिव्ह ॲक्शन'चे जपानमधील रूप) आणि लिंगनिरपेक्ष समानता पुढे नेणारे कायदे या मुद्यांवर चर्चा झाली. यापूर्वीच्या 'इक्वल एम्प्लॉयमेंट अपॉर्च्युनिटी लॉ' (EEOL)मध्ये हे सर्व मुद्दे होतेच असे नाही. अर्थात अशी धोरणे आखण्यात आली तरी प्रत्यक्ष व्यवहारात त्याची अंमलबजावणी कितपत होते, हेही महत्त्वाचे ठरणार आहे.

अनियमित कर्मचाऱ्यांचे प्रमाण फक्त जपानमध्येच वाढले आहे असे नव्हे. औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या अनेक देशांमध्ये हे प्रमाण वाढलेले आहे. मात्र, जपानमध्ये ते प्रमाण अधिक वाढलेले आहे. उदाहरणार्थ, १९९७ ते २००२ या काळात जपानमध्ये ३० लाखांवर नियमित नोकऱ्या संपुष्टात येऊन त्यापेक्षा थोड्या अधिक अनियमित नोकऱ्या उपलब्ध झाल्या. याबाबत मालकवर्गाने कमी पगार आणि अर्धवेळ नोकऱ्या यांचे नेहमीच समर्थन केलेले दिसते. अनियमित नोकऱ्या मान्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे कौशल्य नसते तसेच त्यांच्यावर फारशी जबाबदारीही नसते असे म्हटले जाते. पण दरवेळी असेच असते असेही नाही. अनेकदा अनेक स्त्री-कर्मचाऱ्यांना कौशल्ये वाढविण्याची संधीच दिली जात नाही. शिवाय अर्धवेळ काम करणारे (पार्टो) अनेक जण पूर्णवेळ काम करीत (फॉल्स पार्ट-टायमर्स) असतात. १९८०च्या दशकापासून मात्र अर्धवेळ काम करणाऱ्यांनी आपली कौशल्ये वाढविली असूनही मालकवर्गाच्या भूमिकेत फरक पडलेला नाही. अनियमित कर्मचाऱ्यांना नेमण्यामागे एक कारण असेही आहे की त्यांना कधीही कामावरून काढता येते. खरे तर याबाबत कायदा हा अनियमित कर्मचाऱ्यांच्या बाजूने आहे. पण न्यायालयाकडूनच त्यांना पाठबळ मिळालेले नाही.

अर्धवेळ कर्मचाऱ्यांमध्येही 'कोअर' आणि 'सप्लिमेंटरी' कर्मचारी असे दोन गट मालकांनी पाडले आहेत. मालकवर्गाने आपल्या सोयीसाठी १९८५मधील 'इक्वल एम्प्लॉयमेंट अपॉर्च्युनिटी लॉ'मधून नेहमीच पळवाट काढलेली आढळते. त्यातही स्त्रियांच्याबाबतीत असे बरेचदा करण्यात आले आहे. अशी पळवाट काढणाऱ्या ४६.७ टक्के कंपन्या आढळल्या (२००३). अनेक कंपन्या स्त्री-कर्मचाऱ्यांना कार्यालयांतील उच्च पदांवरदेखील नियुक्त करीत नाहीत. जपानमध्ये उच्च पदांवर पोचलेल्या स्त्रियांचे प्रमाण फक्त नऊ टक्के इतके आहे. विभागप्रमुख असणाऱ्या (बुचो) स्त्रियांचे प्रमाण २.७ टक्के तर, एखाद्या विभागाचे प्रमुख असणाऱ्या (काचो) स्त्रियांचे प्रमाण ५ टक्के आहे. तुलनेने कमी महत्त्वाचे पद मानल्या जाणाऱ्या 'लो-लेव्हल सुपरवायझर्स' (काकारिचो) या पदावर ११ टक्के स्त्रिया आढळतात. अशा पदांवर काम करणाऱ्या स्त्रियांना बढती/पदोन्नतीदेखील देण्यात येत नाही. स्त्रियांसंदर्भात अप्रत्यक्षपणे भेदभाव करणारी धोरणे (अमेरिकेत यासाठी 'ग्लास सिलिंग' असा शब्द रूढ आहे) जपानमधील अनेक कंपन्यांमध्ये आढळतात. भविष्यात अनेक कंपन्या स्त्रियांना जबाबदारीची पदे देणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

काही कंपन्यांमध्ये व सरकारी कार्यालयांमध्ये समानतेचा विचार करण्यात येतोही, पण त्याचे मुख्य कारण जपानमध्ये जन्मदर घटतो आहे हे होय. अशा ठिकाणी अपत्यसंगोपनाच्या सोयींचाही विचार कधीकधी करण्यात येतो. कारण, नोकरीला पात्र ठरलेल्या व आपली क्षमता सिद्ध केलेल्या अनेक स्त्रिया अपत्यसंगोपनाच्या काळात अशा रजा घेणे पसंत करतात. असेही आढळते की, नोकरी करणाऱ्यांमधील दोन-तृतीयांश स्त्रिया गरोदरपणाच्या काळात नोकऱ्या सोडतात कारण त्यांना आपल्या सहकारी कर्मचाऱ्यांवर कामाचा जादा बोजा टाकणे प्रशस्त वाटत नाही, तसेच सहकारी कर्मचारीही जादा काम करण्यास फारसे उत्सुक नसतात. शिवाय ही रजा घेतलेल्या स्त्रियांना परत भेदभावाला सामोरे जावे लागतेच. असे असले तरी १९८० ते १९९५ या काळात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अनेक स्त्रियांनी करियर केले. पण अशा अनंत अडचणींचा सामना करताना त्यांची झालेली ओढाताण पाहून आता अनेक तरुण मुली मात्र 'नोकरी नको' या विचाराप्रत आल्या आहेत. त्यामुळे एकीकडे मनुष्यबळ कमी तर दुसरीकडे नोकऱ्यांमधील असमानतेपायी श्रमांच्या बाजारपेठेत पदार्पण करण्यास अनुत्सुक स्त्रिया, या कात्रीत जपान अडकला आहे.

*(संदर्भ - सी.एस. आर. वीकली)*

अर्थउद्योगातील महिला - ४

# संकल्प समतेचा, आरसा अर्थसंकल्पाचा

सर्वसाधारणपणे जानेवारी महिना मध्यावर आला की आपल्या सगळ्यांनाच अर्थसंकल्पाचे वेध लागतात. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस मांडल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांकडून अर्थकारणातील विविध घटकांना असणाऱ्या अपेक्षांचा मागोवा घेण्याचा उपक्रम माध्यमांद्वारे सुरू होतो आणि मग अर्थसंकल्पाविषयीची एकंदरच उत्सुकता ताणली जाऊ लागते. परंतु, हा असतो केवळ पूर्वार्ध. अर्थसंकल्प सादर झाला रे झाला की 'अर्थसंकल्पाने आपल्याला काय दिले?' असा प्रश्न समाजातील शेतकरी, व्यापारी, नोकरदार, विद्यार्थी, व्यावसायिक, महिला, वयोवृद्ध नागरिक अशा विविध घटकांच्या प्रतिनिधींना विचारत माध्यमे उत्तरार्ध गाजवितात.

मात्र, हा धुरळा अर्थसंकल्पानंतरच्या फारतर दोन दिवसांतच खाली बसतो. समाजातील नानविध घटकांवर अर्थसंकल्पातील कर, अनुदाने तसेच खर्चविषयक तरतुदींचा नेमका काय परिणाम अपेक्षित आहे, या तरतुदींचा व्यवहारात कोणावर केव्हा व कसा परिणाम संभवतो, सरकारच्या धोरणविषयक बांधिलकीचे प्रतिबिंब अर्थसंकल्पात कितपत पडले आहे, समाजात अस्तित्वात असलेली प्रकट व छुपी विषमता निपटून काढण्यासंदर्भात त्या तरतूदी कशा व कितपत उपयोगी ठरतील इतक्या गंभीरपणे, खोलवर असे अर्थसंकल्पाचे औरसचौरस परिशीलन, विश्लेषण सातत्यशीलतेने करण्याची शिस्त आज अभावानेच आढळते. प्रथम ऑस्ट्रेलिया आणि नंतर दक्षिण आफ्रिका या दोन देशांचे ऋण मानावयाचे ते याचसाठी. एकंदर समाजातील 'महिला' या एका अत्यंत महत्त्वाच्या परंतु तुलनेने तितक्याच उपेक्षित घटकास विश्लेषणात केंद्रवर्ती ठेवून अर्थसंकल्पाचे असे 'महिलाकेंद्रित' अध्ययन, छाननी, परिशीलन करण्याची दिशा या दोन देशांनी - त्यातही प्रथम आणि मुख्यत: ऑस्ट्रेलियाने - वैश्विक समुदायास शिकविली.

आज 'जेन्डर बजेट', 'विमेन्स बजेट' अथवा 'जेन्डर सेन्सेटिव्ह बजेट' ही जी संकल्पना अर्थविचारविश्वात स्थिरावली आहे ती या उभय देशांचीच देणगी मानावयास

हवी. 'जेन्डर बजेट', 'विमेन्स बजेट' या शब्दप्रयोगांनी गैरसमज होण्याची शक्यताच अधिक आहे. 'विमेन्स बजेट' म्हणजे केवळ महिलांसाठीच तयार केलेला अर्थसंकल्प, असे अजिबात नाही. अर्थसंकल्पातील विविध प्रस्तावांचे महिलाकेंद्रित विश्लेषण म्हणजे 'विमेन्स बजेट'. अर्थसंकल्पीय तरतुदींच्या लिंगसापेक्ष, लिंगनिहाय परिणामांचे सखोल विवरण, विश्लेषण करण्याची पद्धत म्हणजेच 'जेन्डर बजेट'. अर्थसंकल्पाकडे पाहण्याची, त्याच्यातील तरतूदींचे लिंगसापेक्ष परिशीलन करण्याची ही एक पद्धती आहे. अर्थसंकल्पातील तरतूदींचा, विविध योजनांचा स्त्रिया तसेच पुरुषांना मिळणारा नेमका लाभ कोणता व तो कशा प्रकारे मिळणार आहे, याचे तपशीलवार मंथन म्हणजे 'जेन्डर सेन्सेटिव्ह बजेट'.

वेष, भाषा, प्रांत, धर्म, जात, वर्ग, वर्ण, लिंग यांच्या आधारावर परिपुष्ट झालेला भेदभाव, विषमता यांपासून आज एकही देश मुक्त नाही. विषमतेची ही दरी प्रथम निरुंद बनविणे आणि कालांतराने ती पूर्णतः बुजवून टाकणे, हे कोणत्याही कल्याणकारी सरकारचे आद्य कर्तव्य ठरते. किंबहुना, या ध्येयाप्रत करावयाच्या वाटचालीतील एक प्रमुख साधन म्हणूनही अर्थसंकल्पाकडे पाहावयास हवे. सरकारच्या धोरणांचे, आर्थिक कार्यक्रमांचे, उपक्रम-योजनांचे, त्यासाठी केलेल्या वित्तीय तरतूदींचे लाभ समाजातील सर्वच घटकांना समप्रमाणात मिळावेत, अशीच कल्याणकारी राज्यव्यवस्थेकडून अपेक्षा आहे. विशेषतः, स्त्री-पुरुष विषमतेचा विशेषच प्रादुर्भाव असणाऱ्या समाजांत सरकारच्या, तत्त्वतः लिंगनिरपेक्ष (जेन्डर न्यूट्रल) असणाऱ्या आर्थिक कृती अथवा धोरणांचे व्यवहारात होणार लिंगनिविष्ट परिणाम भिन्न-भिन्न संभवतात. म्हणूनच, अर्थसंकल्पीय तरतूदींचे विश्लेषण त्यांच्या लिंगसापेक्ष संभाव्य तसेच प्रत्यक्ष परिणामांच्या आधारे केले जाणे, हे केवळ अगत्याचेच नाही तर निकडीचे ठरते. त्यानुसार सरकारी धोरणांत उचित असे बदल घडविण्यास ते उपकारकही ठरते.

शिक्षण, आरोग्य, रोजगार, विकासाच्या संधी यांबाबत समाजात असणारी व महिलांच्या अनुभवास येणारी विषमता दूर करणे, ही जर कल्याणकारी राज्यकारभाराचे कंकण बांधलेल्या सरकारची तात्त्विक बांधिलकी असेल, तर त्या बांधिलकीस व्यवहारात आर्थिक पाठबळ लाभले आहे किंवा नाही, याचीही शहानिशा होणे आवश्यक ठरते. अर्थसंकल्पीय तरतुदींची लिंगसापेक्ष, लिंगनिविष्ट छाननी करण्याचा उपक्रम महत्त्वाचा ठरतो तो त्यापायीच. स्त्री-पुरुष समता व्यवहारात प्रस्थापित व्हावी यासाठी सरकारच्या धोरणांत, आर्थिक कृतिकार्यक्रमात नेमका काय विचार आहे आणि तो विचार प्रत्यक्षात

उतरविण्यासाठी कर, अनुदाने वा खर्चविषयक बाबींद्वारा कोणते ठोस प्रयत्न केले जात आहेत याचा अभ्यास हा 'जेन्डर सेन्सेटिव्ह बजेट'मध्ये केंद्रस्थानी आहे. याचाच अर्थ हा की अर्थसंकल्पाचे लिंगसापेक्ष वा लिंगनिविष्ट केले जाणारे विश्लेषण हा केवळ बौद्धिक खटाटोपीचा भाग नाही, तसा तो असणे अपेक्षितही नाही. सरकारचे धोरण, धोरणविषयक त्याची असणारी बांधिलकी आणि त्या बांधिलकीस निधीपुरवठ्याचे पाठबळ लाभले आहे किंवा नाही, हे तपासून त्यानुसार अनुरूप अशी कृती सरकारकडून अपेक्षित आहे. किंबहुना, स्त्री-पुरुष आर्थिक समानतेसंदर्भातील सरकारचे धोरण, तात्विक भूमिका आणि सरकारची प्रत्यक्षातील कृती यांच्यातील सुसंवाद अथवा विसंवाद तपासून त्यानुसार सरकारला अनुरूप अशी सुधारक पावले उचलण्यास उद्युक्त करणे, हीच 'जेन्डर बजेट'च्या संकल्पनेमागील सर्वांत मुख्य प्रेरणा आहे.

अर्थसंकल्पीय तरतुदींचा मुली तसेच महिलांवर व्यवहारात नेमका काय परिणाम होतो, हे तपासण्यासाठी ऑस्ट्रेलिया सरकारने १९८४ ते १९९६ या कालावधीत एक पथदर्शक प्रकल्प राबविला. 'जेन्डर बजेट', अथवा 'जेन्डर सेन्सेटिव्ह बजेट' या संकल्पनांची ही गंगोत्री. म्हणूनच, 'महिलांचे अथवा महिलांसाठीचे' अंदाजपत्रक ('विमेन्स बजेट') या संकल्पनेच्या प्रवर्तकपदाचा मान जातो ऑस्ट्रेलियाकडे. प्रारंभी तरी या विश्लेषणाचा मुख्य भर सरकारी खर्चाच्या लिंगनिविष्ट विश्लेषणावरच होता. अर्थसंकल्पामध्ये मुली तसेच महिलांच्या विकासासाठीच खास अथवा विशेष अशा कोणत्या योजना आहेत, त्या योजनांसाठी एकंदर किती निधीची तरतूद करण्यात आली आहे, सरकारच्या एकूण खर्चात त्या तरतूदीचा हिस्सा किती आहे, अशा अंगांनी ही छाननी हाती घेण्यात आली. पहिल्याच वर्षी या उपक्रमाने एक सत्य प्रकाशात आणले. ते असे की, दक्षिण ऑस्ट्रेलिया प्रांतात महिला व मुलींच्या कल्याणासाठी अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या वित्तीय तरतूदीचे एकूण अर्थसंकल्पीय तरतूदीत प्रमाण होते अवघे एक टक्का !

ऑस्ट्रेलियापासून पुढे स्फूर्ती घेतली दक्षिण आफ्रिकेने. तेथील संसदसदस्य, संशोधक तसेच सेवाभावी संस्था यांनी अर्थसंकल्पाची महिलाकेंद्रित छाननी करण्यास १९९५पासून संयुक्तरित्या प्रारंभ केला. पुढे १९९७ साली सरकारने या विश्लेषणप्रणालीचा स्वीकार केला. या दोन देशांच्या या उपक्रमाने राष्ट्रकुल परिषदेसही प्रेरणा पुरविली. १९९५पासून राष्ट्रकुल सचिवालयानेही एक कृतिकार्यक्रम प्रवर्तित केला. सरकारच्या आर्थिक कार्यक्रमांचे महिला आणि पुरुषांवर होणारे परिणाम स्वतंत्रपणे अभ्यासून

त्यानुसार खर्चविषयक धोरणांत अधिक नेमके व थेट बदल करण्यावर सचिवालयाने भर दिला. सरकारच्या आर्थिक धोरणांचे लिंगनिहाय विश्लेषण करण्याची संस्कृतीच कामकाजात रुळावी यासाठी प्रशासकीय यंत्रणेमध्ये सर्वच स्तरांवर लिंगनिविष्ट कार्यपद्धती, दृष्टिकोण अंगिकारला जावा यासाठी राष्ट्रकुल सचिवालयाने जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू केले. या सगळ्या धडपडीचा परिपाक म्हणजे 'जेन्डर सेन्सेटिव्ह बजेट'ची संकल्पना आजमितीस ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या दोन देशांच्या सीमा ओलांडून जर्मनी, कॅनडा, ब्रिटन, टांझानिया, झिम्बाब्वे, बार्बाडोस, फिजी, सेंट किट्स, श्रीलंका यांसारख्या देशांमध्ये स्थिरावली आहे.

बारकाईने पाहिले तर, 'जेन्डर सेन्सेटिव्ह बजेट' या संकल्पनेचा पैस हा अर्थसंकल्पाचे 'महिलाकेंद्रित' विश्लेषण करण्यापुरताच मर्यादित नाही. आर्थिक व्यवहारांचे अशा प्रकारे केले जाणारे परिशीलन ज्या विविध बाबींसंदर्भात उपयोगी ठरू शकते त्यापैकी काही मुख्य बाबी पुढीलप्रमाणेः

(१) समाजात अस्तित्वात असलेल्या तसेच व्यवहारात जाणवणाऱ्या लिंगसापेक्ष भेदभावांचे शोधन व निश्चितीकरण.

(२) सार्वजनिक पैसा लिंगसापेक्ष समानतेने खर्च केला जावा, याबाबत दक्षता व अंकुश.

(३) सरकारची धोरणात्मक बांधिलकी व अर्थसंकल्पाद्वारे केले जाणारे निधीचे वाटप वा तरतूद यांतील सुसंवाद/विसंवाद यांचा धांडोळा.

(४) आरोग्य, शिक्षण, रोजगार यांसारख्या बाबींच्या पूर्ततेद्वारे महिला तसेच मुलींचे सबलीकरण करण्याच्या सरकारच्या बांधिलकीचे प्रतिबिंब अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये पडते आहे किंवा नाही, याची छाननी.

(५) सार्वजनिक पैशाचे संकलन, वापर, तरतूद, खर्च इत्यादींसंदर्भात समान हक्क आणि महिलांच्या अधिकारांचे रक्षण-संवर्धन यांचे अनुसंधान सुटत तर नाही ना, याबाबतच्या संवेदनशीलतेचे नोकरशाहीत संवर्धन.

(६) सार्वजनिक खर्चविषयक धोरण तसेच सरकारी अर्थसाहाय्याच्या प्राधान्यक्रमामधील आवश्यक बदल व सुधारणांच्या दिशांची स्पष्टता.

या अशा व्यापक भूमिकेतून 'जेन्डर सेन्सेटिव्ह बजेट' या संकल्पनेकडे पाहिले की तिची अनिवार्यता अधिकच प्रकर्षाने जाणवते. तो एक आरसा आहे हे पटते.

*(संदर्भ - अंडरस्टॅन्डिग जेंडर रिस्पॉन्सिव्ह बजेट्स व इंटरनेट)*

# सामाजिक सुरक्षा आणि चीनपुढील पेच

ढोबळ शब्दांत बोलावयाचे तर २००५ हे चीनच्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचे रौप्य महोत्सवी वर्ष होते, असे म्हणता येईल. १९८०च्या आगेमागे (काही अभ्यासकांच्या मते १९७९मध्ये) चीनने आर्थिक पुनर्रचनेचा कार्यक्रम हाती घेतला. त्यानंतरच्या सुमारे पाव शतकाच्या कालावधीत आर्थिक आघाडीवर भरीव कामगिरी करण्यात चीनला यश आलेले असले तरी, या वाटचालीदरम्यान निर्माण झालेल्या एका समस्येने चीनसमोर मोठे आव्हान निर्माण केले आहे. हे आव्हान आहे समाजाच्या सर्व स्तरांतील गरजूंना सामाजिक सुरक्षेचे पुरेसे कवच पुरविण्याचे. चीनसमोर उभा ठाकलेला खरा पेच आहे तो इथेच.

आर्थिक सुधारणांमुळे चिनी नागरिकांचे सर्वसाधारण आर्थिक जीवनमान उंचावले असले तरी, सामाजिक सुरक्षेसंदर्भात आज उद्‌भवलेल्या आव्हानांची मुळेही त्याच प्रक्रियेतून धुमारली आहेत. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाद्वारे सर्वंकष नियंत्रित अर्थकारणाकडून चीन समाजवादाधिष्ठित बाजारपेठीय अर्थव्यवस्थेकडे सरकला. याचदरम्यान, कृषिप्रधान असणाऱ्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे रूपांतरण उद्योग तसेच सेवाप्रधान असणाऱ्या नागरी अर्थव्यवस्थेमध्ये झाले. लोकसंख्या नियंत्रणास चीनने १९७०च्या आसपासच प्रारंभ केला होता. चीनच्या जनन दरात घडून येत असलेली सातत्यपूर्ण घट ही या धोरणाचीच फलश्रुती होय. या सगळ्या स्थित्यंतरांमधूनच चीनसमोर आज एकूण चार मुख्य आव्हाने उभी ठाकलेली दिसतात.

एक तर, जनन दर सातत्याने घटविण्याच्या धोरणापायी चिनी लोकसंख्येची जडणघडण बदलते आहे. ६५ वर्षांवरील निवृत्त वयोवृद्धांच्या संख्येत भर पडण्याबरोबरच एकंदर लोकसंख्येतील त्यांचे प्रमाणही वाढते आहे. त्यातून, या वयोवृद्ध नागरिकांच्या वृद्धापकाळासाठी वित्तीय तरतूद करण्याचा प्रश्न सरकारसमोर खडा होतो आहे. आर्थिक पुनर्रचनेदरम्यानच्या काळात खुल्या बेरोजगारीची समस्या अवघड बनत चालली आहे. तिसरी समस्या आहे ती विशेषतः १९९०च्या दशकाच्या उत्तरार्धापासून तीव्र होत

असलेल्या नागरी भागांतील गरिबीची. अर्थव्यवस्थेत घडून येत असलेल्या बदलांमुळे ग्रामीण परिसरातून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरणाचे प्रमाण वाढावे, यात नवल नाही. मात्र, चीनमधील प्रचलित कायदेकानू तसेच नियमविषयक चौकटीपायी या स्थलांतरितांना शहरी अथवा ग्रामीण यापैकी कोणत्याच सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळू शकत नाही, ही चौथी समस्या आहे.

समाजातील गरजवंतांना सामाजिक सुरक्षेचे कवच पुरविण्याचे आज चीनसमोर साकारलेले आव्हान या चारही समस्यांना भिडलेले आहे. आजमितीस अस्तित्वात असणाऱ्या सहभागात्मक सामाजिक विमा योजनेंतर्गत निवृत्तिवेतन उपक्रमाची व्याप्ती ही केवळ शहरी विभागांपुरतीच सीमित आहे. बरे, शहरी कामगार दलातील सगळ्यांनाच तिचा लाभ मिळतो म्हणावे तर तसेही नाही. नागरी श्रमिकांपैकी निम्मे श्रमिकही या उपक्रमाच्या छत्राखाली येत नाहीत. परंतु, शहरी रहिवाशांसाठी चिनी सरकारने १९९७ सालापासून जी एक 'किमान राहणीमान साहाय्य योजना' राबविली आहे तिच्या माध्यमातून अशा वंचितांना काही प्रमाणात तरी दिलासा मिळू लागला आहे. दारिद्र्य रेषेचे निर्धारण करण्यासाठी ठरविण्यात आलेल्या दरडोई उत्पन्न पातळीपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या घटकांना मासिक १७ डॉलर ते ४४डॉलर इतके अर्थसाहाय्य या योजनेंतर्गत देण्यात येते. सामाजिक विमा योजनेला या नवीन योजनेची जोड मिळाल्याने शहरवासीय आता अधिक सुधारित अशा सामाजिक सुरक्षा कवचाचे लाभार्थी बनले आहेत.

ग्रामीण चीनमधील कामगार मात्र अशा छत्रापासून पूर्णपणेच वंचित आहेत. परिणामी, चीनमध्ये आज मुख्य अभाव आहे तो एकात्मिक, समाजातील सर्व घटकांना एकाच वेळी समानतेने लागू होणाऱ्या सामाजिक सुरक्षा प्रणालीचा. सामाजिक सुरक्षा योजनांची 'शहरी' आणि 'ग्रामीण' अशी वर्गवारी चिरेबंदी आहे. चिनी प्रशासकीय यंत्रणेत केल्या जाणाऱ्या नोंदीनुसार कुटुंबांचे 'नागरी' अथवा 'ग्रामीण' हे वर्गीकरण ठरते. 'ग्रामीण' भागातील एखादी व्यक्ती 'शहरी'भागात स्थलांतरित झाली तरी त्यानुसार तिची वर्गवारी आपसूक बदलत नाही. ती मुखत्यारी चिनी प्रशासकीय यंत्रणेकडे सुपूर्त करण्यात आलेली आहे. त्यामुळे, रोजगारासाठी शहरात प्रदीर्घ काळ वास्तव्यास असणाऱ्या एखाद्या स्थलांतरित ग्रामीणाची शासकीय दप्तरातील वर्गवारी (प्रशासनाने बदल घडवून आणला नाही अथवा तसा बदल करण्यास नकार दिला तर) 'ग्रामीण' अशीच राहते. त्यापायी, 'शहरी' रहिवाशांना लागू होणाऱ्या योजनांना तो स्थलांतरित पात्रच ठरत नाही!

चीनच्या ग्रामीण भागांतील श्रमिकांसाठी सामाजिक विमा योजना मुळात अस्तित्वातच नाही. लहान लहान स्तरावरील आरोग्यसुविधाविषयक तसेच निवृत्तीवेतन विषयक ज्या दोन योजनां आहेत त्यांचा लाभ हा त्या योजनांमध्ये सहभागी होणाऱ्यांनाच काय तो मिळतो. परिणामी, एकूणांतील अत्यंत थोडी ग्रामीण जनताच या दोन योजनांद्वारे मिळणारे मर्यादित लाभ उपभोगू शकते. वयोवृद्ध नागरिकांचे एकंदर लोकसंख्येतील वाढते प्रमाण जाणवत असले तरी ग्रामीण भागांसाठी निवृत्तीवेतनविषयक सुस्पष्ट धोरण तयार करण्याबाबत अजूनही हालचाल नाही, असा अभ्यासकांचा आक्षेप आहे.

सामाजिक सुरक्षा कवचाच्या उपलब्धीसंदर्भात चीनच्या शहरी आणि ग्रामीण भागांत आढळून येणाऱ्या विषमतेमागे चिनी धोरणकर्त्यांची अगदी अलीकडेपर्यंत ठाम असणारी गृहीतकेच बव्हंशी आहेत. १९८०च्या दशकात राबविण्यात आलेल्या जमीनधारणेसंदर्भातील सुधारणा, जमिनीचे फेरवाटप आणि ग्रामीण उद्योगांची जोमदार वाढ यामुळे ग्रामीण भागासाठीच्या सामाजिक सुरक्षा प्रणालीमध्ये सुधारणा घडवून आणण्याची निकडच धोरणकर्त्यांना प्रकर्षाने जाणविली नाही. ग्रामीण कुटुंबांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीचे क्षेत्र त्यांना गरीबीच्या खाईतून बाहेर काढण्यास पुरेसे आहे, हे धोरणकर्त्यांचे गृहीतक होते. परंतु, दारिद्र्याशी मांडलेली लढाई जिंकण्यास कुटुंबांकडील उपलब्ध जमीन (दरडोई जेमतम एक तृतीयांश हेक्टर) अपुरी आहे, ही अटकळ धोरणकर्त्यांना बांधता आली नाही. लोकसंख्येतील सातत्यशील राहिलेली वाढ, स्थलांतरणातील अडचणी आणि शेतजमिनींचा बिगर कृषी उपयोगांसाठी केला जाणारा वाढता वापर यापायी चीनमधील दरडोई जमीनधारणा गेल्या दोन दशकांत घटतेच आहे.

या परिस्थितीत, आरोग्यविषयक सुविधांचा विस्तार आणि गरिबी निवारणासाठी एकात्मिक कार्यक्रम या चिनी ग्रामीण जनतेच्या आजमितीस निकडीच्या दोन गरजा आहेत. आर्थिक पुनर्रचनेदरम्यान अर्थव्यवस्थेत निर्माण झालेला असमतोल, त्यातून निपजलेली विषमता, ग्रामीण तसेच शहरी विभागांतील उग्र होत जाणारी बेरोजगारी यांमुळे चीनमध्ये आता सामाजिक असंतोषाचा धोकाही संभवतो. अशा साऱ्या वातावरणात, शहरी भागांसाठी असणाऱ्या सामाजिक सुरक्षा व्यवस्थेप्रमाणेच ग्रामीण विभागांसाठीही सामाजिक सुरक्षेचे एक व्यापक कवच कसे निर्माण करावयाचे, असा मोठा पेच चिनी धोरणकर्त्यांसमोर आज आहे. *(संदर्भ: 'रिपेअरिंग चायनाज् सोशल सेफ्टी नेट' - लेखक - अतार हुसेन, करंट हिस्टरी).*

# डायपर्स नकोत !

सध्या जमाना 'डायपर'चा आहे. आज डायपरविना मुलांची आपण कल्पनाच करू शकत नाही. अर्थात यात टीव्हीवरील जाहिरातींचा वाटाही मोठा आहे. या जाहिरातींनीही आता पुढची मजल गाठली आहे. म्हणजे, डायपर वापरला नाही की कपडे खराब होतात, ही झाली अत्यंत 'बेसिक' गोष्ट! त्यातही आमचे डायपर बाळाला कसा 'कम्फर्ट' देतात यावर आता या जाहिरातींचा भर असतो. बाळ खदखदून हसते कारण ते 'हगीज्' वापरते, किंवा बाळ एकदम 'ॲक्टिव्ह्' आहे कारण ते 'पॅम्पर्स' वापरते, अशा डायपर प्रसाराच्या नानविध क्लृप्त्या या जाहिरात कंपन्या वापरत असतात. बाळाचे हसणे आणि रडणे जिथे डायपरशी निगडीत आहे, तिथे बाळाच्या (आणि पालकांच्या) आयुष्यात डायपरचे स्थान काय असावे याची कल्पना येते. मूल एक दिवसाचे होत नाही तोवरच त्याला डायपर चढविले जाते आणि त्याला डायपर चढविले की, घरच्यांनाही हायसे वाटते. अमेरिकेतील ही 'डायपर संस्कृती' आता भारतातही फोफावली आहे. डायपर ही 'सोय' न राहता 'गरज' बनली आहे.

बाळाला कडेवर -मांडीवर घेणे सोयीचे जावे, कुठे बाहेर फिरायला जाताना नवीन कपडे खराब होऊ नयेत म्हणून डायपरचा पर्याय समोर आला. त्यातही डायपर एकदा वापरून फेकून द्यायचे असल्याने कपडे धुण्याचा त्रासही वाचला, असा तिहेरी फायदा त्यात होता. पण डायपरच्या फायद्यापेक्षा त्यामुळे होणारे तोटे जास्त आहेत. म्हणूनच आज अनेक बालरोगतज्ज्ञ, बालसंगोपन तज्ज्ञ आणि पर्यावरणप्रेमीही 'डायपरविना संगोपना'वर भर देऊ लागले आहेत.

आजकाल २४ तास मुले 'डायपर'मध्येच असतात. कितीही उच्च प्रतीचा आणि हलका डायपर असला तरी बाळाने दोन वेळा शू केली की, तो वजनाला जड होतो. बरे आपण वरचेवर डायपर बदलण्याची तसदी घेत नाही कारण ते आपल्या खिशाला परवडतही नाही. त्यामुळे कमरेभोवती गुंडाळलेला, जड आणि ओला झालेला तो डायपर मुलांना दिवसातील जास्तीत जास्त वेळ अंगावर वागवावा लागतो. त्यामुळे त्यांच्या नाजूक त्वचेला इजा होते, क्वचितप्रसंगी 'ॲलर्जिक रिॲक्शन'ही येते. अर्थात,

याबद्दल पालकांना माहिती नसतेच असे नाही. पण ते या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात. डायपरच्या वापरामुळे मुलांना होणारी इजा हा झाला एक भाग. परंतु, याहीपेक्षा त्याचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम फार गंभीर आहेत. डायपरच्या मृदुमुलायमतेमागे दडलेल्या या विषारी काट्यांबद्दल फार कमी लोकांना माहिती असावी!

अमेरिकेत मूल जन्माला आल्यानंतर पहिल्या दिवसापासून ते दोन वर्षांपर्यंत डायपरचा वापर केला जातो. या कालावधीत एक मूल साधारण ६ हजार ते १० हजार डायपर वापरते. डायपरमध्ये जो विशिष्ट प्रकारचा कागद वापरला जातो, तो झाडापासून तयार करतात. एक मूल दोन वर्षांत जितके डायपर वापरते, तितके डायपर तयार करण्यासाठी साधारण पाच झाडे कामी येतात. डायपरसाठी वापरण्यात येणारे इलॅस्टिक, वेल्क्रोच्या पट्ट्या, त्यातील विनाइलचे थर, जास्तीत जास्त द्रव शोषून घेण्यासाठी वापरण्यात येणारी सोडियम पॉलिअॅक्रिलेटची जेली आणि डायपरचे पॅकिंग अशा तीस टक्के भागाचे जैविक विघटन होत नाही. वापरलेल्या डायपरची विल्हेवाट कशी लावायची हा एक मोठाच प्रश्न आहे. अमेरिकेत केवळ डायपरमुळे ४३ हजार टनांचा वाढीव कचरा दरवर्षी तयार होतो. वापरून फेकून दिलेल्या डायपरमुळे जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो. अशा डायपरमध्ये दोन आठवड्यांत शंभर विषाणूंची पैदास होते. या कचऱ्यातून पोलिओच्या विषाणूचाही प्रादुर्भाव होतो. याचा जास्त धोका सफाई कामगारांना आहे. या आणि अशा प्रकारच्या धोक्यांमुळे आपल्या आयुष्यातून, डायपर हद्दपार करण्याची वेळ आली आहे.

**डायपरला पर्याय**

लहान मुलांसाठी लंगोट, दोन पायाची चड्डी किंवा अगदीच तान्ह्या बाळांना गुंडाळून घेण्यासाठी सुती कापडाचा वापर उपयुक्त आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. मुलाने कपडे खराब करू नयेत किंवा घरात इतरत्र घाण करू नये यासाठी लंगोटमध्ये आतून व्यवस्थित बसविता येतील अशा सुती कापडाच्या घड्या वापरायला काहीच हरकत नाही. कापडाच्या घड्यांना धुवावे लागते एवढेच काय ते वाढीव काम. लहान मुलांना तहान लागली, भूक लागली, झोप आली की त्यांच्या गरजांकडे आपण जाणीवपूर्वक लक्ष देतो, तर मग त्यांच्या मलमूत्र विसर्जनाच्या गरजेच्याबाबतीत डायपर चढवून रिकामे का होतो ? दीड वर्षाच्या मुलाला बऱ्यापैकी समज आलेली असते. त्याच्या अस्वस्थ हालचालीतून, चुळबुळीतून किंवा चेहऱ्यावरच्या हावभावांवरून त्याला आता काय हवे आहे, हे आपण समजून घेऊ शकतो किंवा

असे करणे जरी शक्य झाले नाही तरी, मूल दिवसातून किती वेळा आणि केव्हा शू करते, झोपून उठल्यावर करते की, खाऊन झाल्यावर करते, याचे निरीक्षण करून आपण त्या वेळी त्याला स्वच्छतागृहात नेऊ शकतो. एकदा का मुलाला ही सवय लागली की, शू करण्यासाठी तो 'त्या जागे'कडेच निर्देश करेल आणि डायपर वापरण्याचा प्रश्नच येणार नाही. अर्थात, यासाठी पालकांनी मुलांकडे बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे. पण सध्याच्या पालकांकडे असे लक्ष द्यायला वेळच नाही. या लक्ष देण्यालाच पाश्चात्त्यांनी 'एलिमिनेशन कम्युनिकेशन' अशी संज्ञा बहाल केली आहे.

डायपर हा पाश्चात्त्यांच्या जीवनशैलीचाच एक भाग झाला आहे. परंतु, त्याचे पर्यावरणावरील संभाव्य घातक परिणाम लक्षात घेऊन तेही आता परंपरागत भारतीय पद्धतींकडे वळू पाहत आहेत. पाश्चात्त्य म्हणतील ती पूर्व, अशी आपली मनोभूमिका असल्याने, त्यांनी सांगितल्यानंतर तरी आपण डायपरच्या वापराबाबत पुनर्विचार करू अशी आशा करायला हरकत नाही.

*(संदर्भ - न्यूयॉर्क टाइम्स, डाऊन टू अर्थ )*

- एकट्या अमेरिकेत दरवर्षी १८ अब्ज डायपर वापरले जातात.
- डायपर तयार करण्यासाठी जगभर वर्षाकाठी एक अब्ज झाडे तोडण्यात येतात.
- डायपरच्या विघटनाचा कालावधी सुमारे ५०० वर्षांचा आहे.
- पालक डायपर वेळच्यावेळी बदलत नसल्याने बालकांमध्ये, विशेषतः मुलींमध्ये जंतुसंसर्गाचे प्रमाण अधिक आहे.
- अमेरिकेतील ४ ते १५ महिने वयोगटातील ६० टक्के मुलांना महिन्यातून एकदा रॅश येते. भारतासारख्या उष्णकटिबंधीय देशात हे प्रमाण जास्त आहे.
- डायपरमध्ये वापरण्यात येणारा सोडियम पॉलिॲक्रिलेट हा पदार्थ त्याच्या पाण्यातील वजनाच्या शंभर पट वजन शोषून घेऊ शकतो. त्यामुळे 'ॲलर्जिक रिॲक्शन' येऊ शकते.
- डिस्पोझेबल डायपर तयार करताना पेपर ब्लिचिंग प्रक्रियेत डायोक्झिन तयार होते. कॅन्सरशी संबंधित जी विषारी रसायने आहेत त्यापैकी डायोक्झिन हे सर्वात विषारी रसायन आहे. प्रयोगशाळेत प्राण्यांवर प्रयोग करताना त्यामुळे प्राण्यांच्या प्रजननक्षमतेत आणि यकृताच्या कार्यात बिघाड झाल्याचे निदर्शनास आले आहे.

*(संदर्भ - डाऊन टू अर्थ, फेब्रुवारी २००५)*

# 'कुरियर' बाळे !

आयुष्यात अधिकाधिक पैसा मिळविण्यासाठी माणूस पडेल ती किंमत मोजावयास तयार असतो. पैसा कमावण्यासाठी आखाती देशांत जाण्याची प्रथा आपल्याकडे काही वर्षांपूर्वी होती. घरातला कर्ता माणूस आपला कुटुंबकबिला मागे ठेवून एकटाच आपली उमेदीची सारी वर्षे पैसा कमावण्यात खर्ची घालत असे. आजमितीस, न्यूयॉर्कच्या चायनाटाऊन वस्तीत राहणाऱ्या चिनी जोडप्यांचीही कहाणी अशीच काहीशी आहे. चायनाटाऊन वस्तीत राहणारे बरेचसे रहिवासी अल्पशिक्षित असून ते अमेरिकेत बेकायदेशीररीत्या राहत आहेत. अल्पशिक्षित असल्याने अकुशल कामगारांना मिळणाऱ्या आर्थिक मोबदल्यात त्यांना न्यूयॉर्कसारख्या महागड्या शहरात उदरनिर्वाहासाठी ढोर मेहनत करावी लागते. त्यातच, त्यांना अमेरिकेत बेकायदेशीर प्रवेश मिळवून देणाऱ्या दलालांचे कर्जही त्यांच्या डोक्यावर असते. त्यामुळे, नव्यानेच लग्न झालेल्या जोडप्यांकडे, नवीन संसाराची घडी बसेपर्यंत, आर्थिक स्थैर्य येईपर्यंत अपत्याला जन्म देण्याबरोबरच त्याच्या संगोपनार्थ ना वेळ आहे ना पुरेसा पैसा ! या परिस्थितीवर मात करण्यासाठी या लोकांनी एक अभिनव मार्ग निवडला आहे. चीनच्या दक्षिणेकडील फुजियन प्रांतातून अमेरिकेत येणाऱ्यांत तरुण जोडप्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. ही जोडपी आपले मूल चार-पाच महिन्यांचे झाले की, त्याची रवानगी चीनमधील आपल्या नातेवाईकांकडे करतात - कशी?.... तर चक्क कुरियरद्वारे! ते मूल शाळेत जाण्याच्या वयाचे झाले की, मग त्याला ते पुन्हा अमेरिकेत घेऊन येतात. चिनी मुलांना सांभाळण्यासाटी सवलतीच्या दरामध्ये उपलब्ध असलेली पाळणाघरेही अमेरिकेत आहेत. पण, येथे प्रवेश घेण्यास उत्सुक असणाऱ्या मुलांची संख्या मोठी असल्याने त्यांची 'वेटिंग लिस्ट'ही लांबलचक असते. या मुलांच्या पालकांच्या दृष्टीने त्याहीपेक्षा अधिक अडचणीची खरी बाब म्हणजे अशा या पाळणाघरांमध्ये प्रवेश हवा असेल तर अमेरिकेतील त्यांचे वास्तव्य हे कायदेशीर असल्याचे सिद्ध करणे बंधनकारक असते. खरी मेख आहे ती इथेच. अमेरिकेतील आपले बेकायदेशीर वास्तव्य सिद्ध होऊ नये म्हणून बरीचशी पालक मंडळी मग कुरियरचा मार्ग निवडतात. चायनाटाऊनमध्ये कुरियरमार्फत मुलांना चीनमध्ये पाठवणाऱ्या पालकांचे प्रमाण ५७ टक्के आहे. त्यामुळे या चिनी कसब्यात कुरियरवाल्यांचा व्यवसाय अगदी तेजीत चालू आहे. या सेवेसाठी आकारले

जाणारे एक हजार डॉलरचे शुल्कही पालकांना परवडणारे आहे. आपल्या पोटच्या चिमुकल्या गोळ्याला शेकडो मैलांवर पाठवून देताना या आईबापांच्या काळजाला काय घरे पडत असतील, याची कल्पनाच केलेली बरी. पण खरी समस्या तर सुरू होते पुढेच. पुढे तीन-चार वर्षांनंतर ही मुले आईवडिलांकडे परत आल्यानंतर नवीन आणि पूर्णपणे अपरिचित अशा वातावरणाशी जुळवून घेणे हे त्यांना खूपच अवघड जाते. इंग्रजीसारख्या परक्या भाषेचा गंध नाही, आपली वाटणारी माणसे आजूबाजूला नाहीत, शाळेतही नवीन मुले आणि नवीन संस्कृती, अशा परिस्थितीत त्या बालमनांना केवढ्या संघर्षातून जावे लागत असेल? नवीन भाषा, नवीन संस्कृती, नवीन नातेसंबंध आपलेसे करण्यासाठी कोवळ्या वयात या मुलांवर जणू जबरदस्तीच केली जाते. या सगळ्याचा या मुलांच्या मनावर काय परिणाम होत आहे, याचा अभ्यास न्यूयॉर्क विद्यापीठातील एक संशोधक डॉ. हेन्री चुंग हे करीत आहेत. चुंग म्हणतात की, या मुलांना एका वातावरणातून समूळ उखडून दुसऱ्या वातावरणात रुजवल्याने ते त्या वातावरणाशी एकरूप होऊ शकत नाहीत. त्यांच्यात असुरक्षिततेची भावना रुजते. त्यातूनच बालवयातील आजार, नैराश्य, वर्तणुकीतील दोष वाढीस लागतात. आई - वडिलांच्या मजबूरीचे परिणाम मुलांनी का भोगायचे? पालकांच्या ज्या समस्या असतील त्या त्यांनी अन्य मार्गाने सोडवाव्यात, त्यासाठी मुलांना वेठीस धरू नये, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

*(संदर्भ - 'द सन' - नोव्हेंबर २००५)*

## भेट अंक योजना

**'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना पत्रिकेचे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.**

# ... हेचि जनसेवेचे साधन

*आज भरपूर उत्पादन। हेचि जनसेवेचे साधन ।*
*त्यासाठी झटेल जो जो जन। गीता कळली तयासि।। १८.१८*
*मंदिरी बैसोनि नाक दाबावे। त्यापेक्षा मार्गीचे काटे उचलावे।*
*दुःखितासि प्रेमे पाणी पाजावे। हे श्रेष्ठ तीर्थस्थानाहूनि।। १८.१९*
*एक हात खोदावी जमीन। हे पूजनाहूनि पूजन।*
*परिणाम शेकडो व्याख्यानांहून। अधिक तयाचा।। १८.२०*
*म्हणोनि सर्वांनी काम करावे। ग्रामाचे धन वाढवावे।*
*येथे गरीब-श्रीमंत न पाहावे। कामासाठी।। १८.२६*

संघटन ही ग्रामविकासाची, जनसेवेची पूर्वअट. जनसेवेसाठी कटिबद्ध होण्यापूर्वी 'जनसेवा म्हणजे काय?' याबाबतची संकल्पना ग्रामस्थांच्या मनात स्पष्ट हवी. गावातील उत्पादक क्षमतांचे संगोपन-संवर्धन करून उत्पादन वाढविण्यासाठी एकीपूर्वक झटणे, हेच जनसेवेचे साधन आहे असा निर्वाळा तुकडोजी देतात. अंगमेहनत हा या साधनाचा गाभा आहे, तर धनवृद्धीच्या माध्यमातून निर्माण होणारी समृद्धी हे साध्य आहे. यासाठी 'गरीब - श्रीमंत' हा भेद विसरून सगळ्यांनीच काम केले पाहिजे. केवळ बोलका सुधारकी बाणा काय कामाचा? तुकडोजींना अभिप्रेत असणाऱ्या भौतिक अभ्युदयास अस्तर आहे ते लोकाभिमुख, कर्ममय अध्यात्माचे.

### न्यायसंस्थेचा निवाडा 'इंटेलिजन्ट डिझाइन'च्या विरोधात

अमेरिकेतील शालेय शिक्षणात, विद्यार्थ्यांना 'इंटेलिजन्ट डिझाइन'चे प्रमेय शिकविण्यात येऊ नये असा निर्णय अलीकडेच अमेरिकी न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे 'जगाची उत्क्रांती की निर्मिती?'या विषयी चालू असलेल्या वादावर आता तरी पडदा पडावा अशी अपेक्षा आहे. यासंबंधीचे लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या सप्टेंबर २००५ च्या अंकात (पृष्ठ ५ व ३६) प्रसिद्ध करण्यात आले होते.





<u>अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना</u>

(१५ ऑक्टोबर २००४ पासून )

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त १०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त १८० / - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ४००/- रुपये व दोन पुस्तिका भेट** |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) अर्थबोधपत्रिकेचा मेंदूसंशोधन विशेषांक (फेब्रुवारी - मार्च २००५) - (किंमत चाळीस रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

Globalization, ICT and Developing Nations - Challenges in the Information Age; by Sumit Roy; Published by Sage Publications; pp.245; Price-Rs.340/-

सध्याचे युग हे निःसंशय माहिती आणि संपर्क तंत्रज्ञान [Information and Communication Technology - ICT] यांचे युग आहे. जागतिकीकरण आणि ICT यांच्यातील नातेही अतिशय महत्त्वपूर्ण आहे. अक्षरशः निमिषार्धात अतिशय व्यापक भौगोलिक भागात संपर्क साधण्याच्या सामर्थ्यामुळे ICT चे, राष्ट्रराष्ट्रांमधल्या संबंधांच्या दृष्टीने खूपच दूरगामी असे परिणाम असतात. जागतिकीकरण आणि ICT यांच्यातील सहसंबंध हा एक अतिशय महत्त्वाचा विषय असूनही आतापर्यंत त्याकडे काहीसे दुर्लक्षच झाले आहे. प्रस्तुत पुस्तकामुळे ही त्रुटी बऱ्याच अंशी दूर होईल, असे लेखकाचे मत आहे. अर्थात, जागतिकीकरणाचा व्यापक अभ्यास करण्याचा हेतू इथे नाही. मात्र उपलब्ध प्रकाशित वाङ्‌मयाला पूरक ठरू शकेल, असे हे पुस्तक आहे.

जागतिकीकरण आणि ICT यांच्या संबंधांवर प्रकाशझोत टाकीत असताना, लेखकाने असे मत व्यक्त केले आहे की, सरकारी संस्थांपेक्षा बिनसरकारी संस्थाच अर्थव्यवस्थांमध्ये वेगाने बदल घडवून आणू शकतात. वाढ आणि विकास यांच्या संदर्भातील प्रत्येक राष्ट्राचे अनुभव वेगवेगळे असतात; तसेच, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याच्या त्यांच्या क्षमताही वेगवेगळ्या असतात. त्यांच्या अशा क्षमतांचा शोध घेणे, हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. या पुस्तकात मूलगामी दृष्टिकोण आणि विश्लेषणात्मक व धोरणविषयक अंतरंग वाचकाला समजावून देण्याचीही क्षमता आहे. त्यामुळे अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, आंतरराष्ट्रीय संबंध -अशा अनेक विषयांचे शिक्षक आणि विद्यार्थी, तसेच आंतरराष्ट्रीय मदत संस्था, स्वयंसेवी संस्था अशा सर्वांच्याच दृष्टीने प्रस्तुत पुस्तक रंजक आहे.

■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करून प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर •योगेंद्र यादव

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**